


गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १७२ * नांदेड * सोमवार, दि. २९ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# ऑपरेशन सिंदूरमध्ये सुभेदार मेजरसह सहा जवान शहीद; वर्षभरानंतर पहिल्यांदाच नावे जाहीर

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** ऑपरेशन सिंदूर दरम्यान शहीद झालेल्या सहा भारतीय सशस्त्र दलाच्या जवानांची नावे प्रथमच अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहेत. या नावांचा समावेश राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या वेबसाइटवरील 'रोल ऑफ ऑनर'मध्ये करण्यात आला आहे. त्यांची नावे नवी दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या वॉल-३डी वरील २०२५ विभागातही कोरण्यात आली आहेत. ६-७ मे २०२५ च्या मध्यरात्री, पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी छावण्यांविरुद्ध भारतीय सशस्त्र दलांनी केलेल्या लष्करी कारवाईत हे जवान शहीद झाले.




मिळालेल्या माहितीनुसार, भारत सरकारने ऑपरेशन सिंदूरमध्ये राष्ट्रासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सहा शूर जवानांची नावे प्रथमच जाहीर केली आहेत. या सर्व शहीदांसाठी दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारकात एक जागा निश्चित करण्यात आली आहे, जिथे त्यांची नावे विशेष ग्रॅनाइट विटांवर कायमस्वरूपी कोरली जातील. या सहा शहीदांमध्ये भारतीय लष्कराचे पाच जवान आणि भारतीय हवाई दलाचे एक सार्जंट यांचा समावेश आहे. रायफलमन सुनील कुमार यांना मरणोत्तर वीर चक्र, तर सार्जंट सुरेंद्र कुमार यांना एअर मेडल प्रदान करण्यात आले. संरक्षण सूत्रांनुसार, यातील बहुतेक जवान जम्मू आणि काश्मीरमधील मोहिमेदरम्यान शहीद झाले. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, भारतीय सशस्त्र दलांनी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील जैश-ए-मोहम्मद आणि लश्कर-ए-तोयबाच्या नऊ दहशतवादी तळांवर अचूक हल्ले केले. १० मे रोजी भारत आणि पाकिस्तानच्या लष्करी कारवायांच्या महासंचालकांमध्ये झालेल्या चर्चेनंतर, दोन्ही देशांनी लष्करी कारवाई थांबवण्यास सहमती दर्शवली. राष्ट्रीय युद्ध स्मारकाचे उद्घाटन २०१९ मध्ये झाले. इंडिया गेटजवळ २०१९ मध्ये राष्ट्रीय युद्ध स्मारकाचे उद्घाटन करण्यात आले. स्वातंत्र्यापासून देशाचे रक्षण करताना शहीद झालेल्या सैनिकांची नावे येथे कोरलेली आहेत. या सहा नावांच्या समावेशामुळे, ऑपरेशन सिंदूरला राष्ट्रीय युद्ध स्मारकावर अधिकृतपणे सन्मानित करण्यात आलेल्या लष्करी मोहिमांच्या यादीत स्थान मिळाले आहे. दरम्यान, ऑपरेशन सिंदूरनंतर शेकडोवेळा अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध थांबवल्याचा दावा केला आहे. नवी कोरी विमाने पाडण्यात आली असाही दावा त्यांनी बोलताना केला होता. भारताने ट्रम्प यांच्या वक्तव्यांवर थेट नाव घेऊन खुलासा केला नसल्याने विरोधी पक्षांनी सातत्याने सरकारच्या भूमिकेवरून तोफ डागली आहे.

# 'टीईटी' पेपर फुटीप्रकरणी आरोपींना आठ दिवसांची पोलीस कोठडी

**ठाणे (प्रतिनिधी) –** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा पेपरफुटी प्रकरणात भिवंडी पोलिसांच्या तपासाला वेग आला आहे. या प्रकरणातील तीनही आरोपींना आज न्यायालयात हजर करण्यात आले. पोलिसांनी दहा दिवसांच्या कोठडीची मागणी केली होती. मात्र न्यायालयाने आरोपींना ६ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात आंतरराज्यीय रॅकेट कार्यरत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून आणखी दोन आरोपी फरार असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे.

राज्य शिक्षक पात्रता म्हणजेच टीईटी पेपरफुटी प्रकरणातील आरोपी धीरज बलराज सिंग (२८, हरियाणा), राजीव साव (४५, बिहार) आणि आकाशकुमार स्वराजकुमार (३०, बिहार) यांना रविवारी भिवंडी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयातील न्यायाधीश एस. एम. सुतार यांच्या सुट्टीच्या न्यायालयात हजर करण्यात आले. तपासादरम्यान आरोपींकडून टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले. तसेच या प्रकरणामागे आंतरराज्यीय रॅकेट असल्याचा संशय असून दोन संशयित आरोपी अद्याप फरार आहेत. पेपर नेमका कुठून आला, महाराष्ट्रात आणखी कुठे विक्री करण्यात आली का, आर्थिक व्यवहार कोणकोणाशी झाले आणि या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास करण्यासाठी पोलिसांनी १० दिवसांच्या कोठडीची मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने ८ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून ६ जुलैपर्यंत आरोपींना पीसीआर देण्यात आला आहे.

दरम्यान, आरोपी धीरज सिंगच्या वकिलांनी त्याच्यावर



यापूर्वी बॅरिएट्रिक (आतड्याशी संबंधित) शस्त्रक्रिया झाल्याने नियमित औषधोपचाराची गरज असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर पोलिसांनी आवश्यक वैद्यकीय उपचार दिले जात असल्याचे स्पष्ट केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने तिन्ही आरोपींना ६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. आता या तपासात फरार आरोपींचा शोध, आर्थिक व्यवहार आणि संपूर्ण पेपरफुटी रॅकेटचा पर्दाफाश करण्यावर पोलिसांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

# कंधार तालुक्यातील पेठकर कुटुंबियांचे पंतप्रधान मोदींकडून 'मन की बात'मध्ये कौतुक

**नांदेड (प्रतिनिधी)–** कंधार तालुक्यातील बहादरपुरा येथील सिद्धेश्वर पेठकर यांच्या विवाहसोहळ्याची सध्या संपूर्ण देशात चर्चा होत आहे. पेठकर कुटुंबियांनी लग्नाचे 'रिटर्न गिफ्ट' म्हणून सुमारे साडेतीन हजार गावकऱ्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचा अपघाती विमा काढून दिला आहे. या अनोख्या आणि समाजोपयोगी उपक्रमाची दखल खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली असून, आजच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून त्यांनी या घटनेची माहिती संपूर्ण देशाला देत पेठकर कुटुंबाचे भरभरून कौतुक केले.

'मन की बात' कार्यक्रमात देशवासीयांशी संवाद साधताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, आपल्या देशात वाढदिवस किंवा लग्नकार्य हे केवळ कौटुंबिक कार्यक्रम नसून तो संपूर्ण समाजाचा उत्सव असतो. कौटुंबिक सोहळ्यात पाहुण्यांना भेटवस्तू दिल्या जातात. परंतु, महाराष्ट्रातील नांदेडमधील बहादरपुरा गावात राहणाऱ्या पेठकर कुटुंबाने आपला आनंद वाटण्यासाठी असा एक निर्णय घेतला आहे, जो सर्वांसाठी चर्चेचा विषय बनला आहे. जर आनंद वाटायचाच असेल, तर कठीण काळात एखाद्या कुटुंबाला आधार देणारी गोष्ट द्यावी, या विचारातून त्यांनी घरातील विवाहाच्या निमित्ताने गावातील जवळपास साडेतीन हजार लोकांसाठी अपघात विम्याची व्यवस्था केली, असे पंतप्रधानांनी सांगितले. या उपक्रमामागील भावना अत्यंत हृदयस्पर्शी असल्याचे सांगितले.

### खा. अशोकराव चव्हाणांचा नवरदेवाला दूरध्वनी

पंतप्रधानांनी या अनोख्या उपक्रमाची माहिती संपूर्ण देशाला दिल्यानंतर राज्याचे माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांनी नवरदेव सिद्धेश्वर पेठकर यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे विशेष अभिनंदन केले. फोनवर बोलताना खा. चव्हाण म्हणाले की, तुमच्या कुटुंबाने घेतलेल्या या स्तुत्य निर्णयाची दखल थेट देशाच्या पंतप्रधानांनी घेणे ही नांदेड जिल्ह्यासाठी आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

# समृद्धी महामार्गावर अपघात, एकाच कुटुंबातील ५ जण ठार



**अमरावती (प्रतिनिधी) –** नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर पुन्हा एकदा भीषण अपघात झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. चंद्रपूरवरून अकोल्याकडे जाणारी भरधाव कार उभ्या कंटेनरला धडकली. या घटनेत कारमधील एकाच कुटुंबातील पाच जण ठार झाले आहेत. हा अपघात रविवार (दि.२८) दुपारी १२ वाजता धामणगाव रेल्वे नजीक घडला.

मिळालेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गावर धामणगावजवळील चॅनल क्रमांक १०६ नजीक हा अपघात घडला. मृतांमध्ये आरती जीवने (४०), भास्कर महादेव जीवने (५७), महादेव जीवने (४२), त्रिशा जीवने (१२) व लता महादेव जीवने (४३, सर्व रा. डीएड कॉलेजजवळ, बाहुपेठ, चंद्रपूर) यांचा समावेश आहे. हे सर्व जण चंद्रपूरवरून अकोला येथे एका कार्यक्रमाला जात असताना उभ्या कंटेनरला त्यांच्या वाहनाने धडक दिली.

घटनेची माहिती मिळताच समृद्धी महामार्ग पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली, पोलिसांनी तातडीने अपघातग्रस्तांना धामणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात नेले, मात्र तिथे डॉक्टरांनी पाचही जणांना मृत घोषित केले. चालकाला डुलकी आल्यामुळे हा अपघात झाला असल्याचे समजते.

# चिराग पासवान यांची गुरुद्वारास भेट



**नांदेड (प्रतिनिधी)–** केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान यांनी नांदेड येथील दौऱ्यात सुप्रसिद्ध श्री हजूर साहिब सचखंड गुरुद्वारास भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी गुरुद्वाराचे पुजारी यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्यासोबत त्यांचे कुटुंबियांची उपस्थिती होती.

यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड, जिल्हा कृषी अधीकारी दत्तकुमार कळसाईत, एमआयडीसी मॅनेजर गजानन कपाळे आदीची उपस्थिती होती. यावेळी केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनी तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारात लंगर प्रसाद घेवून सेवा केली. यानंतर नामदार पासवान यांनी कुटुंबियांसह माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांची भेट घेतली. यावेळी त्यांचे महापौर कविता मुळे, आ. अमरनाथ राजूरकर, माजी मंत्री डी. पी. सावंत यांच्यासह भाजप पदाधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# परभणीच्या सभेत उद्धव ठाकरे यांची खा. जाधव व भाजपवर सडकून टीका

**मुंबई (प्रतिनिधी)–** परभणीचे खासदार संजय जाधव यांच्यासह राज्यातील सहा खासदारांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. या मोठ्या राजकीय भूकंपानंतर शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आक्रमक पाऊल उचलले असून, ते प्रत्येक बंडखोर खासदाराच्या मतदारसंघात जाऊन जाहीर मेळावे घेत आहेत. याच पार्श्वभूमीवर आज परभणीत शिवसेना निष्ठावंतांचा मोठा मेळावा पार पडला. या सभेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी बंडखोर खा. संजय जाधव यांच्यासह भाजपवर जोरदार हल्लाबोल केला.

सभेची सुरुवात करताना उद्धव ठाकरे म्हणाले, येथे खुर्च्यांवर जे लोक बसले आहेत ते भाड्याने आणलेले नाहीत, तर ते हक्काची माणसे आहेत. तुझा माज उतरवण्यासाठी एक शब्द पुरेसा आहे. बोलून बोलून किती बोलणार? खासदार संजय जाधव यांच्यावर तोफ डागताना उद्धव ठाकरे म्हणाले, जेव्हा मी शेतकऱ्यांसाठी दौरा काढला




होता, तेव्हा आमदार राहुल पाटील माझ्यासोबत होते. हा गद्दार मात्र दौऱ्याला नव्हता, कुठेच हा गद्दार दिसला नाही. आता म्हणतो की उद्धव ठाकरेंनी लक्ष दिलं नाही. हो, माझी चूक झाली! लक्ष दिलं असतं तर तुझ्या भानगडी आधीच कळल्या असत्या.

ते पुढे म्हणाले, मी येथे विधानसभेसाठी प्रचाराला आलो होतो आणि लोकसभेला सुद्धा आलो होतो. लोकसभेला तो स्टेडियम पूर्ण भरला होता. राहुल पाटील आपल्याला त्याच स्टेडियमम ध्ये पुन्हा एक सभा घ्यायची आहे. त्याच स्टेडियम वर जिथे त्या गद्दारासाठी सभा घेतली होती. वाघाचं कातडं पांगरलेला हा एक होता. मी दोघांचे हात वरती केले. त्यातला एक हात राहुलने जो पकडला होता तो वरच्या वर अजूनही अभिमानाने आहे आणि दुसरा पळाला. हे विकास करण्यासाठी पळाले, असा हल्लाबोल त्यांनी यावेळी केला.

पक्षांतर केलेल्या ६ खासदारांच्या अपात्रतेच्या मुद्द्यावर बोलताना उद्धव ठाकरे यांनी संविधानाचा दाखला दिला. त्यांनी सांगितले की, खासदार फुटत असताना आम्ही लोकसभा अध्यक्षांना पत्र देऊन आमचे म्हणणे ऐकून घेण्याची विनंती केली होती. जर देशात कायद्याचे राज्य असेल तर हे ६ खासदार बाद झालेच पाहिजेत. जर तुम्ही कायदा पाळला नाही, तर लोकसभा अध्यक्ष इतरांना कायदा पाळायला सांगू शकणार नाहीत. आम्ही अधिकार मानतो, कोणाची मर्जी मानणार नाही.

कायद्याचे रक्षण करणारे लोकसभा अध्यक्ष आहेत, असा माझा समज आहे. घटनेचे उल्लंघन होऊ देऊ नका, नाहीतर इतिहास तुम्हाला 'घटना मोडणारे लोकसभा अध्यक्ष' म्हणून नोंदवेल, असा इशारा त्यांनी दिला.

# आषाढी यात्रेवरही तुकाराम मुंढेंचं लक्ष

## वारकऱ्यांना स्वच्छ अन् चांगले अन्नपदार्थ मिळण्यासाठी पालकमंत्र्यांचे निर्देश


**सोलापूर (प्रतिनिधी) –** राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभाग सध्या चांगलाच चर्चेत असून आयुक्त तुकाराम मुंढेंच्या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे. विशेष म्हणजे विधिमंडळ अधिवेशनातही मुंढेंच्या कामाचा धडाका आणि कार्यवाहीचे कौतुक करतण्यात आले आहे. त्यातच, यंदाच्या आषाढीवारी यात्रा उत्सवातही तुकाराम मुंढे यांचा इफेक्ट दिसणार असून पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी तसे संकेत दिले आहेत. आषाढी वारीच्या तयारी संदर्भात आज पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत जिल्हा प्रशासनाची बैठक पंढरपूर येथे पार पडली. या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना जयकुमार गोरे यांनी तुकाराम मुंढेंचा उल्लेख केला. आपण तुकाराम मुंढे यांच्याशी बोलणार असून आषाढी यात्रेत भाविकांना चांगले अन्नपदार्थ मिळावेत, अशा सूचना देणार असल्याचे त्यांनी सांगितले.



यात्रेच्या तयारीमध्ये पालखी मार्ग आणि पंढरपूर शहरात आषाढी यात्रा कालावधीमध्ये येणाऱ्या लाखो भाविकांना चांगले आणि स्वच्छ अन्नपदार्थ मिळावेत यासाठी अधिकाऱ्यांना सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. याबाबत मी तुकाराम मुंढेंना बोलणार आहे, असे देखील गोरेंनी म्हटले. दरम्यान, कालच बुलढाण्यातील शेगाव येथे अन्न व औषध विभागाच्या पथकाने धाड टाकून मंदिर परिसरातील पेढ्याच्या दुकानातून नमुने जप्त केले आहेत.

आषाढी यात्रा काळात भाविकांच्या सुविधेसाठी परिवहन विभागाने ५००० एसटी बसेस उपलब्ध करून दिल्या असून यावर्षी चांगल्यात चांगली सुविधा देण्याची कबुली परिवहन विभागाने दिल्याचे गोरे यांनी सांगितले. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज या पालखी मार्गाची नव्याने निर्मिती झाल्यामुळे अनेक निवाऱ्याची झाडे रस्त्याच्या कामात पाडण्यात आली होती. यावर्षी जिल्हा परिषदेच्या कडून १० हजार झाडे पालखी मार्गावर लावण्याचा निर्णय झाल्याची माहिती गोरे यांनी दिली.

जयकुमार गोरेंनी आज पंढरपुरात येऊन पालखी मार्गासह चंद्रभागा वाळवंट, ६५ एकर परिसरसह सर्व भागांची पाहणी केली. या पाहणीनंतर चंद्रभागेत पाणी सोडण्यासाठी थेट मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले जाणार असल्याचे गोरे यांनी सांगितले.




# किल्ले रायगडावर रोपवेसाठी मंजुरी

**रायगड (प्रतिनिधी) –** महाराष्ट्राचे प्रेरणास्थान आणि स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडावर छत्रपती शिवरायांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेण्यासाठी देशभरातून शिवभक्त येत असतात. रायगडावर दरवर्षी ६ जून रोजी मोठा शिवराज्याभिषेक दिनाचा सोहळा देखील संपन्न होतो. त्यासाठी, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शिवभक्त येतात. तर, वर्षभर किल्ला पाहण्यासाठी पर्यटकांचीही भेट असते. आता, या सर्व शिवभक्त आणि पर्यटकांसाठी आनंदाची बातमी आहे. कारण, किल्ले रायगडावर जाण्यासाठी आता नवीन रोपवे उभारला जाणार असून केवळ ५० ते १०० रुपयांमध्ये शिवभक्तांना गडावर जाता येणार आहे. विशेष म्हणजे, हा सरकारी रोपवे असणार आहे, अशी माहिती माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी दिली.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# मंदिरातील दानपेटी कोणासाठी?

आपल्या देशामध्ये धार्मिक संस्था प्रचंड आर्थिक सामर्थ्य आणि सामाजिक प्रभाव बाळगतात. शासन, उद्योग किंवा कॉर्पोरेट क्षेत्रावर ज्या प्रकारची आर्थिक पारदर्शकता आणि लेखापरीक्षणाची सक्ती असते, तशी अपेक्षा धार्मिक संस्थांकडून फारशी केली जात नाही. उलट श्रद्धेच्या नावाखाली आर्थिक व्यवहारांकडे प्रश्न न विचारण्याची मानसिकता अनेकदा दिसून येते. मात्र, श्रद्धेचे व्यवस्थापन करणाऱ्या संस्थांनीही आपल्या देणगीदारांसमोर उत्तरदायी असणे आवश्यक आहे. देशातील धार्मिक अर्थव्यवस्थेचा विस्तार प्रचंड आहे. विविध अभ्यासांनुसार भारतीय कुटुंबांकडून धार्मिक कार्यांसाठी दरवर्षी हजारो कोटी रुपयांचे योगदान दिले जाते. मंदिर, गुरुद्वारे, मशिदी, चर्च आणि जैन संस्थांकडे अब्जावधी रुपयांची स्थावर आणि जंगम मालमत्ता आहे. धार्मिक पर्यटन, प्रसारमाध्यमे, पूजासाहित्य आणि इतर पूरक उद्योगांमुळे हा आर्थिक प्रवाह आणखी वाढतो. त्यामुळे हा विषय केवळ श्रद्धेपुरता मर्यादित राहत नाही, तर व्यापक सामाजिक आणि आर्थिक परिणाम घडविणारा ठरतो. अयोध्येतील राम मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नाही, तर भारतीय समाजाच्या सांस्कृतिक आणि भावनिक अस्मितेचे प्रतीक म्हणून उभे राहिले आहे. पाचशे वर्षांच्या गुलामीनंतर लाखो भक्तांच्या श्रद्धा, समर्पण आणि आर्थिक योगदानातून साकारलेल्या या प्रकल्पाभोवती निर्माण झालेल्या आर्थिक अनियमिततेच्या आरोपांनी केवळ निधीच्या गैरव्यवहाराचा प्रश्न निर्माण केलेला नाही, तर धार्मिक संस्थांच्या पारदर्शकतेवर आणि उत्तरदायित्त्वावरही गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. हा प्रकार केवळ आयोध्यातील श्रीराम मंदिराबाबतच आहे असे नाही तर देशातील अनेक मोठ्या मंदिरात सुद्धा असेच होत असण्याची दाट शक्यता आहे, परंतु जोपर्यंत पकडल्या जात नाही तोपर्यंत तो चोर नसतो, या न्यायाने ते सगळं लपलेलं आहे. धार्मिक कार्यासाठी दिलेली देणगी ही केवळ आर्थिक व्यवहार नसतो; ती श्रद्धा आणि विश्वासाचे प्रतीक असते. त्यामुळे अशा निधीच्या वापराबाबत निर्माण होणारी शंका ही समाजातील विश्वासालाच तडा देणारी ठरते. आयोध्येतील मंदिरासाठी देशभरातून हजारो कोटी रुपयांचा निधी जमा झाला. मंदिर उभारणीसह यात्रेकरूंसाठी पायाभूत सुविधा विकसित करण्याकरिता या निधीचा वापर करण्यात आला. मात्र, निधीच्या मोजणीपासून ते त्याच्या व्यवस्थापनापर्यंत अनियमिततेचे आरोप समोर आल्यानंतर धार्मिक संस्थांच्या आर्थिक व्यवहारांची विश्वासार्हता चर्चेचा विषय बनली आहे. धार्मिक संस्थांमधील निधी व्यवस्थापनातील अनियमितता ही नवीन बाब नाही. अनेक ठिकाणी दानपेट्यांतील रकमेवरून वाद, अपहार किंवा गैरव्यवहाराच्या घटना अधूनमधून समोर येत असतात. मात्र त्यांची अधिकृत नोंद किंवा तपास क्वचितच होतो. कारण अशा विषयांमध्ये संस्थेची प्रतिष्ठा, संबंधित समाजाच्या भावना आणि राजकीय प्रभाव हे घटक आडवे येतात. त्यामुळे समस्या माहीत असूनही तिच्यावर प्रभावी उपाययोजना करण्याची इच्छाशक्ती कमी पडते. या पार्श्वभूमीवर आर्थिक व्यवहार अधिक पारदर्शक करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नियमित स्वतंत्र लेखापरीक्षण आणि देणग्यांची डिजिटल नोंद या बाबींचा गांभीर्याने विचार होण्याची गरज आहे. काही तज्ज्ञांनी प्रत्येक भक्ताकडून प्रतीकात्मक स्वरूपात अल्प रकमेची देणगी स्वीकारण्याचा पर्याय सुचविला आहे. मात्र, देणगीवर मर्यादा घालणे हा उपाय नसून, निधीच्या संपूर्ण व्यवस्थापनात पारदर्शकता निर्माण करणे अधिक महत्त्वाचे ठरेल. धार्मिक संस्था समाजजीवनात महत्त्वाची भूमिका बजावतात. शिक्षण, आरोग्य, अन्नदान आणि सामाजिक सेवा या क्षेत्रांत अनेक संस्था मोठे योगदान देतात. त्यामुळे त्यांच्या आर्थिक व्यवहारांवर प्रश्न उपस्थित करणे म्हणजे श्रद्धेवर आघात नव्हे, तर त्या संस्थांवरील लोकांचा विश्वास अधिक दृढ करण्याचा प्रयत्न आहे. श्रद्धा आणि उत्तरदायित्व यांच्यात संघर्ष नसून, दोन्ही एकमेकांना पूरक असू शकतात. अयोध्येतील घडामोडींनी एक व्यापक प्रश्न उपस्थित केला आहे. तो केवळ एका मंदिरापुरता मर्यादित नाही, तर सर्व धर्मांच्या संस्थांसाठी समानपणे लागू होणारा आहे. धार्मिक स्वातंत्र्याइतकीच आर्थिक पारदर्शकताही महत्त्वाची आहे. कारण श्रद्धेची खरी ताकद ही केवळ भावनांमध्ये नसून, त्या भावनांमागील विश्वास अबाधित ठेवण्यात आहे. धार्मिक संस्थांनी स्वतःहून अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी व्यवस्थेचा स्वीकार केला, तर समाजातील श्रद्धा अधिक बळकट होईल आणि भविष्यात अशा वादांनाही मोठ्या प्रमाणावर आळा बसेल.

# शेतकऱ्यांच्या हित जोपासणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना



महाराष्ट्रातील शेती ही प्रामुख्याने पावसावर अवलंबून असल्याने दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटांचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसतो. पिकांचे नुकसान झाल्याने अनेक शेतकरी वेळेवर पीक कर्जाची परतफेड करू शकत नाहीत. परिणामी ते थकबाकीदार ठरतात आणि त्यांना पुढील हंगामासाठी नव्याने कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होतात. या अडचणी दूर करून बळीराजाला दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. २ जून २०२६ रोजी मंत्रिमंडळाने या योजनेस मंजुरी दिली.

**दोन प्रमुख घटक**

या योजनेत दोन महत्त्वाचे घटक समाविष्ट करण्यात आले आहेत. पहिला म्हणजे थकबाकीदार शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती आणि दुसरा म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर लाभ.

**दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती**

१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत अल्पमुदत पीक कर्ज घेतलेल्या आणि ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेल्या तसेच ३१ मार्च २०२६ पर्यंत कर्जाची परतफेड न केलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

एका किंवा अनेक बँकांमधील सर्व पात्र कर्जखात्यांवरील मुद्दल व व्याजासह एकूण थकबाकीची कमाल दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. यासाठी शेतीच्या क्षेत्रफळाची कोणतीही अट ठेवण्यात आलेली नाही.

**पुनर्गठित कर्जांनाही लाभ**

अल्पमुदत पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन किंवा फेरपुनर्गठन करण्यात आले असून त्याचे हप्ते ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असतील, तर अशा शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफीचा लाभ मिळेल.

२०१९ च्या लाभार्थ्यांसाठी विशेष तरतूद

ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वी महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ चा लाभ घेतला आहे, त्यांना या नव्या योजनेत कमाल ५० हजार रुपयांपर्यंतच कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे.

**एकवेळ समझोता (OTS) योजना**

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. अशा शेतकऱ्यांनी अतिरिक्त रक्कम संबंधित बँकेत जमा केल्यानंतर शासनाकडून दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम ओटीएस अंतर्गत अदा केली जाईल.

२०१९ च्या कर्जमाफीचे लाभार्थी असल्यास ५० हजार रुपयांपेक्षा जास्त थकबाकीतील अतिरिक्त रक्कम शेतकऱ्यांनी भरल्यानंतरच त्यांना ५० हजार रुपयांचा ओटीएस लाभ मिळेल. शेतकऱ्यांना त्यांचा हिस्सा भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन**

सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्ज घेऊन ते नियमानुसार मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे.

ज्या शेतकऱ्यांचे पीक कर्ज ५० हजार रुपयांपेक्षा कमी आहे, त्यांना त्यांनी भरलेली मुद्दल व व्याजाची प्रत्यक्ष रक्कम किंवा किमान पाच हजार रुपये प्रोत्साहन म्हणून मिळतील. मात्र, या लाभासाठी पात्र शेतकऱ्यांनी २०२५-२६ आणि २०२६-२७ या वर्षांतील पीक कर्जाचीही नियमानुसार वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.

पात्रता आणि महत्त्वाच्या अटी

या योजनेचा लाभ 'वैयक्तिक शेतकरी'या निकषावर दिला जाणार असून कुटुंब हा निकष मानला जाणार नाही. राष्ट्रीयीकृत, खासगी, प्रादेशिक ग्रामीण, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच स्वतःच्या निधीतून कर्ज वाटप करणाऱ्या प्राथमिक कृषी पतसंस्थांमधील पात्र कर्जखात्यांना या योजनेचा लाभ लागू राहील. लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक डिजिटल मंचावर नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

**कोण राहणार अपात्र?**

माजी किंवा विद्यमान मंत्री, खासदार, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे माजी व विद्यमान पदाधिकारी, २५ हजार रुपयांपेक्षा अधिक मासिक वेतन घेणारे शासन व सार्वजनिक उपक्रमांचे अधिकारी-कर्मचारी, शेतीबाह्य उत्पन्नावर आयकर भरणारे, २५ हजार रुपयांपेक्षा अधिक निवृत्तीवेतन घेणारे निवृत्तीवेतनधारक (माजी सैनिक वगळून) तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी साखर कारखाने, नागरी सहकारी बँका, जिल्हा बँका, दूध संघ यांचे पदाधिकारी आणि पात्र वेतनधारक कर्मचारी या योजनेस अपात्र असतील. मात्र, साखर कारखान्यांतील हंगामी कामगारांना लाभ मिळणार आहे. ज्या शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळेल, त्यांना नियमित कर्जफेडीसाठीचा प्रोत्साहनपर लाभ मिळणार नाही.

**पूर्णपणे ऑनलाइन अंमलबजावणी**

योजनेची संपूर्ण अंमलबजावणी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने केली जाणार आहे. योजनेच्या एकूण निधीपैकी ०.५ टक्के रक्कम ऑनलाइन पोर्टल, जनजागृती, शेतकरी मेळावे, आपले सरकार सेवा केंद्र आणि प्रशासकीय खर्चासाठी वापरण्यात येणार आहे.

**'सहकार स्टॅक'ची उभारणी**

भविष्यात शेतकऱ्यांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेगवान कर्जपुरवठा करता यावा, यासाठी सहकार आयुक्त स्तरावर 'सहकार स्टॅक'ही डिजिटल प्रणाली विकसित करण्यात येणार आहे.

राज्यातील लाखो थकीत शेतकऱ्यांना पुन्हा पतदार बनविणे आणि नव्याने पीक कर्ज उपलब्ध करून ही योजना शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय नांदेड**

# आधुनिक भारताच्या विकासाचा पाया : प्रशांतचंद्र महालनोबिस आणि संख्याशास्त्र

आज जगातील सर्वात मौल्यवान संपत्ती कोणती, असा प्रश्न विचारला तर अनेक जण पैसा, सोने किंवा तेल असे उत्तर देतील; परंतु आधुनिक युगात 'डेटा हेच नवे तेल' मानले जाते. या डेटाचे संकलन, विश्लेषण आणि त्यातून योग्य निष्कर्ष काढण्याचे विज्ञान म्हणजे संख्याशास्त्र होय. त्यामुळेच राष्ट्रीय संख्याशास्त्र दिनाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

**भारतीय संख्याशास्त्राचे जनक**

प्रशांतचंद्र महालनोबिस यांचा जन्म २९ जून १८९३ रोजी कोलकाता येथे झाला. त्यांनी केंब्रिज विद्यापीठातून शिक्षण घेतले. भौतिकशास्त्राचा अभ्यास करत असतानाच त्यांना संख्याशास्त्राची गोडी लागली आणि पुढे त्यांनी या विषयाला भारतात नवी दिशा दिली.सन १९३१ मध्ये त्यांनी कोलकाता येथे इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटची स्थापना केली. ही संस्था आज जगातील अग्रगण्य सांख्यिकी संशोधन संस्थांपैकी एक मानली जाते. भारताच्या पंचवार्षिक योजनांच्या निर्मितीत, राष्ट्रीय उत्पन्नाच्या अंदाजामध्ये, शेती, उद्योग, लोकसंख्या आणि आर्थिक नियोजनात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**महालनोबिस अंतर : जगाला दिलेली अनमोल देणगी**

प्रा. महालनोबिस यांनी विकसित केलेले महालनोबिस अंतर हे संकल्पनात्मक योगदान आजही डेटा विश्लेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, चेहराविश्लेषण, वैद्यकीय संशोधन, प्रतिमा प्रक्रिया आणि औद्योगिक गुणवत्तानियंत्रणामध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जाते.आजच्या आधुनिक डेटा सायन्समध्ये हे तंत्र अत्यंत उपयुक्त मानले जाते. एखाद्या निरीक्षणाचे इतर निरीक्षणांशी असलेले अंतर आणि वेगळेपण शोधण्यासाठी या पद्धतीचा वापर केला जातो.

**नमुना सर्वेक्षण पद्धतीचा पाया**




भारतातील मोठ्या लोकसंख्येमुळे प्रत्येक व्यक्तीची माहिती गोळा करणे शक्य नसते. अशा वेळी प्रा. महालनोबिस यांनी विकसित केलेली नमुना सर्वेक्षण पद्धती अत्यंत उपयुक्त ठरली. कृषी उत्पादन, लोकसंख्या, रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक सर्वेक्षणांमध्ये ही पद्धती आजही वापरली जाते.राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या संकल्पनेमुळे भारतातील धोरणनिर्मितीला वैज्ञानिक आधार मिळाला. शासनाच्या अनेक योजना आजही सांख्यिकीय सर्वेक्षणांच्या आधारावर आखल्या जातात.

**संख्याशास्त्राचे वाढते महत्त्व**

आजचे जग हे माहिती आणि डेटावर आधारित आहे. शासन, उद्योग, बँकिंग, विमा, आरोग्य, शेती, हवामान, शिक्षण, क्रीडा, ई-कॉमर्स, सामाजिक माध्यमे, निवडणुका आणि संशोधन अशा प्रत्येक क्षेत्रात संख्याशास्त्राचा प्रभाव वाढत आहे.कोविड-१९ महामारीच्या काळात रुग्णसंख्या, मृत्यूदर, लसीकरण, संसर्गाचा प्रसार आणि भविष्यकालीन अंदाज यासाठी संख्याशास्त्र अत्यंत महत्त्वाचे ठरले. हवामान बदल, पर्जन्यमान, शेतीचे अंदाज, शेअर बाजारातील चढ-उतार आणि आर्थिक नियोजनामध्येही संख्याशास्त्राची भूमिका अनन्यसाधारण आहे. क्रिकेटसारख्या खेळात फलंदाजांची सरासरी, स्ट्राइक रेट, विजयाची शक्यता, संघ रचना आणि कामगिरीचे विश्लेषण संख्याशास्त्रावर आधारित असते. आधुनिक क्रीडाविश्लेषणामध्ये डेटा विश्लेषकांना मोठी मागणी आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्सचे युग**

आज जग कृत्रिम बुद्धिमत्ते कडे वेगाने वाटचाल करत आहे. मशीन लर्निंग, बिग डेटा, डेटा मायनिंग, डीप लर्निंग आणि प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्स यांचा पाया संख्याशास्त्रातच आहे. गुगल, मायक्रोसॉफ्ट, अमेझॉन, मेटा यांसारख्या जागतिक कंपन्यांपासून भारतातील विविध तंत्रज्ञान कंपन्यांपर्यंत डेटा विश्लेषक आणि सांख्यिकी तज्ज्ञांची मोठ्या प्रमाणावर गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे संख्याशास्त्र हा विषय केवळ शैक्षणिक विषय न राहता करिअरच्या असंख्य संधी उपलब्ध करून देणारा विषय ठरला आहे.

**रोजगाराच्या नव्या संधी**

आज संख्याशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी पुढील क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत :डेटा सायंटिस्ट,डेटा ॲनालिस्ट,बिझनेस ॲनालिस्ट,बायोस्टॅटिस्टिशियन,ॲक्च्युअरी,रिसर्च ॲनालिस्ट,मार्केट रिसर्च तज्ज्ञ,धोरण विश्लेषक (पॉलिसी ॲनालिस्ट) ,मशीन लर्निंग तज्ज्ञ,बँकिंग आणि विमा क्षेत्र,सरकारी सांख्यिकी सेवा,अध्यापन आणि संशोधन आदी.आज अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये डेटा सायंटिस्ट आणि विश्लेषकांना आकर्षक वेतनासह रोजगार उपलब्ध होत आहे.

**तरुणांसाठी प्रेरणादायी संदेश**

प्रशांतचंद्र महालनोबिस यांचे जीवन हे जिज्ञासा, संशोधन, कठोर परिश्रम आणि राष्ट्रसेवेचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांनी केवळ एक विषय विकसित केला नाही, तर भारताच्या विकासाला वैज्ञानिक दिशा दिली.आजचा युवक जर डेटा समजून घेऊ लागला, तर्कशुद्ध विचार करू लागला आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारला, तर तो केवळ स्वतःचे भविष्य घडवणार नाही, तर देशाच्या विकासातही मोलाचे योगदान देऊ शकेल.

राष्ट्रीय संख्याशास्त्र दिन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो- माहितीचे ज्ञानात आणि ज्ञानाचे विकासात रूपांतर करण्याची शक्ती संख्याशास्त्रात आहे.आजच्या डिजिटल आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात संख्याशास्त्र हे केवळ आकड्यांचे विज्ञान नसून देशाच्या विकासाचे, सुजाण निर्णयांचे आणि उज्ज्वल भविष्याचे प्रभावी साधन बनले आहे.चला, राष्ट्रीय संख्याशास्त्र दिनानिमित्त डेटा समजून घेऊया, वैज्ञानिक विचार स्वीकारूया आणि विकसित भारताच्या निर्मितीत आपले योगदान देऊया.

**-प्रा. विजय कोष्टी,**
कवठेमहांकाळ,जि. सांगली

# वैद्यकीय विमा आणि कायदेशीर अडचणी



व्यक्तीच्या आयुष्याबाबतच्या नियोजनात आरोग्य विमा हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. व्यक्ती अकस्मात येणारे वैद्यकिय संकटास सामोरे जाण्यासाठी आरोग्य विम्याची तजविज किंवा व्यवस्था करत असतो. कुटुंबास कधी काही आरोग्यविषयक संकट आले तर त्यास मोठ्या प्रमाणावर अर्थीक आवशकता भासते व ही रक्कम मोठी असते म्हणून वैद्यकिय विम्याचे नियोजन व्यक्ती करत असते.

परंतु वैद्यकिय विमा घेताना काही कायदेशीर बाबी पाहणे फार आवश्यक असते. जर या कायदेशीर बाबींकडे आपण दुर्लक्ष केले तर वैद्यकिय विमा असुनसुध्दा विमा क्लेम पासुन विमाधारकास वंचीत रहावे लागते. व विमा काढण्याचा हेतु पुर्णतः फोल ठरतो.

साधारणतः वैद्यकिय विमा काढताना किंवा क्लेम करताना खालील महत्वपुर्ण बाबींचा विचार करणे आवश्यक असते.

१) आपल्या एजंट कडून पॉलीसी बाबत सवीस्तर माहीतीपुस्तक घेणे किंवा माहीती घेणे-

साधारणत: अधीकाधीक विमा ग्राहक हे पॉलीसी बाबत एजंट ने तोंडी दिलेल्या माहीतीवर अधारीत राहून पॉलीसी काढतात अशी तोंडी दिलेली माहीती तंतोतंत आहेच असे सांगता येत नाही. तेव्हा विमा ग्राहकाचे हे अगदी प्रथम कर्तव्य आहे कि विमा ग्राहकाने आपल्या एजंट कडुन पॉलीसीबाबत सविस्तर माहीतीपुस्तक घ्यावे ते निट वाचन करावे व त्यात काही बाबी संदीग्द वाटल्या तर त्याबाबत एजंट ला किंवा विमा कंपनी च्या मॅनेजर ला त्याबाबत विचारणा करावी व आपले शंका निरसन करावे. बरेचदा ग्राहक विमा पॉलीसीच्या अटी व शर्ती वाचन न करता पॉलीसी घेतात, व जेव्हा क्लेम किंवा विमा दावा करण्याची वेळ येते तेव्हा विमा क्लेम मिळत नाही.

पॉलीसी फॉर्म सविस्तर वाचन करून मगच त्या पॉलीसी फॉर्मवर सही करणे हे महत्वाचे असते कारण एखादा विमा ग्राहक जेव्हा एखादे विमा प्रस्ताव अर्जावर सही करतो तेव्हा त्या ग्राहकास त्या प्रस्तावातील सर्व अटी शर्ती मान्य आहेत असा अर्थ होत असतो. म्हणून विमा प्रस्ताव फॉर्मचे काळजीपूर्वक वाचन करून मगच त्यावर स्वाक्षरी करणे हे जरुरी आहे. पुर्वीचे असणारे आजाराबाबत सुचना- पॉलीसी प्रपोजर फॉर्ममध्ये विमा ग्राहकाने पुर्वीपासून असणारे रोगाबाबत विमा प्रस्तावात सुचना किंवा माहीती देणे आवश्यक असते. अन्यथा असणारे रोगाबाबत माहीती लपउन ठेवली या कारणास्तव विमा कंपनी त्याच रोगासंबंधात किंवा अन्य रोगाबाबतचा विमा दावा नाकारु शकतात. कारण पुर्वीपासून असणारे रोगाबाबत माहीती लपउन ठेवली हे विमा दावा नाकारण्याचे एक महत्वपुर्ण कारण ठरु शकते... वैद्यकिय विमा घेताना एक बाब लक्षात घेणे अत्यंत आवश्यक असते कि यामध्ये स्पेसीफाईड डिसीज साठी जो वेटींग पिरीयड किंवा प्रतीक्षा कालावधी असतो तो कालावधी झाल्याशिवाय स्पेसीफाईड डिसीज च्या बाबतीत वैद्यकिय विमा लाभ मिळत नसतो. स्पेसीफाईड डिसीज ची जी यादी आहे ती आपल्या विमा एजंट कडून निट समजुन घ्या.

५) विमा दावा दाखल करताना क्लेम सोबत आवश्यक ती सर्व हॉस्पीटल चे कागदपत्रे पॅथॉलॉजी रिपोर्ट डायग्नोस्टीक रिपोर्ट तसेच सर्व वैद्यकिय बिले न विसरता दाखल करावीत.

६) विमा कंपनी ने जर क्लेम बाबत काही क्युरी किंवा त्रुटी काढली असेल किंवा काही कागदपत्रे मागीतली असतील तरी ती देणे ही ग्राहकाची जबाबदारी आहे. अशी मागीतलेली कागदपत्रे देवुन ती प्राप्त झाल्याबाबत विमा कंपनी कडुन रिसीव्हड घ्यावी किंवा प्राप्त झाल्याबाबत पावती घ्यावी.

७) विमा कंपनी सोबत कोणताही पत्रव्यवहार करताना एक तर मेल द्वारे करावा किंवा हार्ड कॉपी अर्ज असेल तर विमा कंपनी कार्यालयाकडुन कागदपत्रे किंवा अर्ज प्राप्त झाल्याचा शेरा विमा कंपनी कडुन घ्या. केवळ कागदपत्रे देणे हे पर्याप्त नसते तर अशी कागदपत्रे दिल्याबाबत आपल्याकडे तसा पुरावा असणे आवश्यक असते.

८) विमा कालावधी संपल्यावर त्वरीत किंवा त्या अगोदरच त्वरीत विमा पॉलीसीचे नुतनीकरण करणे आवश्यक असते. जर विमा पॉलीसी खंडीत असण्याच्या कालावधीत कोणती आरोग्य समस्या निर्माण झाली तर विमा क्लेम मिळण्यास अडचणी येवू शकतात. व आपण सतत अनेक वर्ष प्रीमीयम भरूनसुध्दा विमा सुविधेपासून वंचीत राहाते लागु शकते.

९) उपरात्त प्रकारे सर्व प्रक्रीया करूनसुध्दा जर विमा कंपनी विमा क्लेम देण्यास

नकार देत असेल तर सर्वप्रथम विमा कंपनी ला एक लिगल नोटीस द्या. १०) जर विमा कंपनीने विमा क्लेम विनाकारण नाकारला असेल किंवा देण्यास टाळाटाळ करत असेल तर प्रत्येक जिल्हा स्तरावर ग्राहक आयोग आहेत तेथे या अन्यायाविरुध्द तुम्ही ग्राहक म्हणून दाद मागु शकता.

**-ॲड. अनिरुद्ध कांजाळकर**
नांदेड
मो. ९७३०४१४०७५

# नांदेड उपनिबंधक कार्यालयातील 'भ्रष्टाचारा'ची चौकशी करण्याची मागणी

**भोकर (प्रतिनिधी)**– नांदेड येथील जिल्हा उपनिबंधक कार्यालयात कार्यरत असलेल्या काही अधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करत मोठ्या प्रमाणावर शासकीय महसुलाचे नुकसान केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या आणि उच्चस्तरीय चौकशीच्या मागणीसाठी माहिती अधिकार संघटन समितीचे संस्थापक अध्यक्ष आणि भोकरचे माजी नगरसेवक केशव मुद्देवाड यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. २ जुलै २०२६ पासून मुंबईत बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

केशव मुद्देवाड यांनी दिलेल्या निवेदनानुसार या कार्यालयातील काही अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दस्त नोंदणी करताना मोठा आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचे म्हटले आहे. गुंठेवारी कायद्याचे उल्लंघन करून ५०० ते ६०० बनावट दस्त नोंदवल्याचा गंभीर आरोप केला आहे. ७/१२ मध्ये फेरफार करून, बनावट कागदपत्रे तयार करून आणि काही ठिकाणी नियमबाह्य तुकडेबंदीचे व्यवहार केल्याचे पुरावे त्यांनी सादर केले आहेत.

या प्रकरणाची दखल घेत यापूर्वी गठित करण्यात आलेल्या चौकशी समितीवर केशव रामा मुद्देवाड यांनी गंभीर आरोप केले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी आर्थिक देवाणघेवाण करून ही समिती 'मॅनेज' केली असून, तक्रार दडपण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे या समितीवर त्यांचा विश्वास नसून, राज्यस्तरावरून उच्चस्तरीय ५ सदस्यीय समिती गठित करून सखोल चौकशी करण्यात यावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे. दोषी अधिकारी राजकीय वरदहस्ताचा दावा करत तक्रारदारांना धमकावत असल्याचे पत्रात नमूद आहे. आम्ही थेट महसूल मंत्र्यांचे जवळचे आहोत, त्यांना हप्ते पोहोचवतो, अशी भाषा वापरून अधिकारी केशव रामा मुद्देवाड आणि इतर तक्रारदारांवर दबाव आणत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

## २ जुलैपासून मुंबईत एल्गार

प्रशासनाने या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर तत्काळ निलंबनाची कारवाई करून फौजदारी गुन्हे दाखल न केल्यास, २ जुलै २०२६ पासून मुंबईतील आझाद मैदानावर शेकडो कार्यकर्त्यांसह बेमुदत आमरण उपोषण आणि 'बोंब मारो' आंदोलन करण्याचा निर्धार केशव रामा मुद्देवाड यांनी केला आहे. या आंदोलनादरम्यान काही अनुचित प्रकार घडल्यास त्याला संबंधित अधिकारी आणि प्रशासन जबाबदार राहील, असेही त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

## प्रशासनाला कारवाईचे निर्देश

या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन कारवाई करण्यासाठी केशव मुद्देवाड यांनी नोंदणी उपमहानिरीक्षक (लातूर), जिल्हाधिकारी (नांदेड), सह जिल्हा निबंधक (नांदेड) आणि पोलीस महासंचालक (मुंबई) यांना प्रतिलिपीद्वारे माहिती दिली असून, आंदोलनाची आगाऊ सूचना आझाद मैदान पोलीस स्टेशनला देण्यात आली आहे.

## रोटेगाव येथे टॉवर कार सायडिंग व शेडचे लोकार्पण

**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील नव्याने स्थापन झालेल्या ट्रॅक्शन डिस्ट्रीब्युशन विभागाच्या ओव्हरहेड इक्विपमेंट देखभाल व्यवस्थेला अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत, रोटेगाव यार्ड येथे समर्पित टॉवर कार सायडिंग व टॉवर कार शेड १८ मे २०२६ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे.

नांदेड विभागातील टीआरई विभागाला नुकत्याच सुमारे सहा टॉवर कार उपलब्ध झाल्या आहेत. या टॉवर कारच्या माध्यमातून दैनंदिन ओएसई देखभाल, नियमित तपासणी, बिघाडांच्या वेळी तातडीची दुरुस्ती तसेच आपत्कालीन पुनर्स्थापना कार्य प्रभावीपणे करता येणार आहे. या वाहनांचा अधिकाधिक कार्यक्षम वापर सुनिश्चित करण्यासाठी देखभाल कर्मचाऱ्यांची 24x7 उपलब्धता असलेल्या डेपोच्या होमिंग यार्डमध्ये स्वतंत्र स्टेबलिंग सुविधा आवश्यक होती.

रोटेगाव येथे उभारण्यात आलेल्या या समर्पित टॉवर कार सायडिंग व शेडमुळे टॉवर कार सुरक्षितपणे उभ्या ठेवता येणार असून, ओएसई बिघाड, देखभाल, तपासणी तसेच आपत्कालीन परिस्थितीत त्या त्वरित घटनास्थळी रवाना करता येतील. त्यामुळे ओएसई यंत्रणेची विश्वासार्हता, उपलब्धता आणि देखभाल कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होणार आहे.

# उद्यानाच्या विकासासाठी कटिबद्ध

## ■ माजी उपमहापौर विनय पाटील गिरडे




**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उद्यानाच्या विकासासाठी आमदार निधी व मनपाच्या विकास निधी मिळवून घेऊ आणि उद्यान विकसित करण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन माजी उपमहापौर विनय पाटील गिरडे यांनी केले. ते नामफलक अनावरण प्रसंगी बोलत केले.

हडको परिसरातील पी-१ पी-२, वाघाळा येथील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज उद्यानाच्या नामफलकाचा अनावरण सोहळा दि. २८ जून रोजी पार पडला. या वेळी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी अध्यक्षीय समारोपामध्ये संभाजी महाराज उद्यानासाठी दहा लक्ष रूपये संरक्षण भिंतीसाठी देण्याचे आश्वासन नगरसेवक संजय पाटील घोगरे यांनी दिले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड मनपाचे माजी उपमहापौर तथा शिवसेना दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, प्रभाग क्रमांक २० चे भाजपाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे, शिवसेनेचे दक्षिण शहरप्रमुख सुहास पाटील खराणे, वृक्षमित्र मोहन पाटील घोगरे यांच्यासह सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, नागरिक व युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य, त्याग आणि हिंदवी स्वराज्याप्रती असलेल्या अतुलनीय योगदानाच्या स्मरणार्थ या उद्यानास त्यांचे नाव देण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे आयोजन दीपक पाटील खैरे, दिगा पाटील, श्याम पाटील वडजे, गजानन पाटील कळकेकर, किशनराव पाटील तिडके बोंढारकर, बाळू पाटील घोगरे, संतोष पाटील खैरे, दिलीपराव टोम्पे, सरजू पाटील खैरे, सुनील पाटील शिंदे, केशव पाटील बोडके, देविदास पाटील तिडके बोंढारकर, श्याम पाटील कदम, संतोष जेलेवाड, आनंदराव तेलंगे, किरण पाटील तिडके, घनश्याम जाधव, शिवा पाटील तिडके, साईनाथ तेलंगे, केशव वारकड, दिगंबर घोगरे, टिवले, अनेश घोगरे, गजू पाटील शिंदे, पुंडलिक तेलंगे, गजानन खैरे, प्रमोद काळेवाड, दीपक पाटील सूर्यवंशी, संभाजी जाधव, बालाजीराव तरटे, बंटी काळेवाड, संतोष कोकाटे, दादाराव पाटील जाधव, दत्ता पाटील लांवड यांनी केले आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष खैरे यांनी तर सूत्रसंचालन संजय काचावार यांनी केले.

# कोळी येथे 'शेती तंत्रज्ञान स्वातंत्र्य सत्याग्रह' संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यातील कोळी येथे शेती तंत्रज्ञान स्वातंत्र्य सत्याग्रह नुकताच पार पडला.

या सत्याग्रहाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार वामनराव चटप यांची उपस्थिती होती. तर केंद्रीय कृषी मूल्य आयोगाचे सदस्य गुणवंत पाटील हंगरगेकर, कृषी तंत्रज्ञान आघाडीचे अध्यक्ष मिलिंद दामले यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे आयोजन शेतकरी संघटनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव शिंदे व हदगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी केले होते.

शेतकऱ्यांना सन्मानाने जीवन जगता यावे यासाठी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करून द्यावे, तंत्रज्ञानावर आधारित नवीन एचटीबीटी व बीजी फोर, बीजी फाईव्ह बियाणे तयार करण्यासाठी केंद्र सरकारने परवानगी द्यावी आणि हे नवीन सुधारित बियाणे उपलब्ध करून देण्यास कंपन्यांना प्रतिबंध करू नये यासाठी शेतकरी संघटनेने खानदेश, विदर्भ आणि मराठवाड्यात हा सविनय कायदेभंग सत्याग्रह कार्यक्रम राबवला जात आहे. खानदेशात नंदुरबार येथे तर विदर्भात राळेगाव तालुक्यातील खडकी येथे तसेच अंजनगाव सुर्जी जि. अमरावती येथे प्रतिबंधित एचटीबीटी बियाणे लावणीचे सविनय कायदेभंग आंदोलन केले. त्याप्रमाणेच आता मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यातील कोळी येथे हा सविनय कायदेभंग सत्याग्रह म्हणजेच सरकारने प्रतिबंधित केलेले एचटीबीटी कपाशी बियाणे लागवणीचा कार्यक्रम संपन्न झाला.

सत्याग्रह होऊ नये यासाठी हदगाव पोलीस ठाण्यातील निवघा चौकीच्या पोलिसांनी ज्या शेतकऱ्याच्या शेतात हे बियाणे लावायचे होते आणि जिथे सभा घ्यायची होती त्या शेतकऱ्याला दोन दिवस अगोदरपासूनच धमकीखाली घेतले. त्यांच्याकडून माझ्या शेतात कार्यक्रम करण्यास शेतकरी संघटनेला परवानगी देणार नाही असे लिहून घेतले. परंतु तालुक्यातील अनेक लढवय्या शेतकऱ्यांनी येऊन कोळी येथेच शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष दत्तराव चोतमल यांच्या शेतामध्ये हे प्रतिबंधीत बियाणे लागवणीचा सविनय कायदेभंग सत्याग्रह आंदोलन पार पाडले.

यावेळी बोलताना शेतकरी संघटनेच्या तंत्रज्ञान आघाडीचे अध्यक्ष मिलिंद दामले यांनी एचटीबीटी बियाणे काय आहे आणि त्यापासून शेतकऱ्यांचा फायदा काय हे समजावून सांगितले. चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा मतदारसंघात शेतकरी संघटनेतर्फे माजी राष्ट्रीय अध्यक्ष वामनराव चटप यांनी शेतकरी संघटनेच्या आंदोलनाबाबत सविस्तर माहिती दिली. आता यापुढे आधुनिक तंत्रज्ञानाशिवाय शेती शक्य नाही आणि सरकार तंत्रज्ञान वापरण्यास परवानगी देत नाही.

बियाण्यापासून उत्पादित झालेली धान्य आणि तेल खाल्ले तर कॅन्सर होते या सबबीखाली एचटीबीटी बियाण्याला परवानगी देत नाही, परंतु याच तंत्रज्ञानाने तयार झालेल्या इतर देशातील धान्य आणि तेल मात्र आयात करून लोकांना खाऊ घातले जात आहे हा सरकारचा दुटप्पीपणा आहे. एका कपाशीचे बियाणे तयार करणाऱ्या कंपनीने बोलगार्ड नावाने बियाणे उत्पादित करून त्यात परवानगी न घेता हा जीन्स वापरला परंतु सरकार अशा कंपन्यांना कोणतेही अटकाव करत नाही.

यावेळी बोलताना केंद्रीय कृषी मूल्य आयोगाचे सदस्य गुणवंत पाटील हंगरगेकर म्हणाले की, एचटीबीटी बियाणे गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणात तयार होते. संपूर्ण गुजरातमध्ये याची लागवड सुद्धा होते, परंतु तिथे कोणतीही कारवाई केली जात नाही, म्हणून आम्ही हेच बियाणे वाजत गाजत महाराष्ट्रात आणण्याचा प्रयत्न केला होता, त्यावेळी गुजरातमध्ये कोणतीही कारवाई नाही, परंतु नंदुरबार जिल्ह्यात सरकारने अटकाव करून कार्यकर्त्यावर कारवाई केली. सरकारचा हा दुजाभाव शेतकऱ्यांच्या आत्महत्यास कारणीभूत ठरणार आहे. या कार्यक्रमात व्यापार आघाडी प्रमुख विजय निवल, युवा आघाडी माजी प्रदेशाध्यक्ष सतीश दाणी, अ‍ॅड. धोंडीबा पवार, प्रतापराव देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

# आंबेडकरवादी मिशनच्या राज्यस्तरीय प्रवेशपूर्व परीक्षेस राज्यातून प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)**– आंबेडकरवादी मिशनच्या राज्यस्तरीय प्रवेशपूर्व परीक्षेसाठी संपूर्ण राज्यातून मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेला विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला.

या प्रवेशपूर्व परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सहा महिन्यांसाठी यूपीएससी, एमपीएससी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्गात प्रवेश देण्यात येईल. तसेच दिल्ली येथील सुप्रसिद्ध 'नेक्स आयएएस' या क्लासच्या सुविधा निःशुल्क दिल्या जाणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा लाखो रुपयांचा खर्च वाचणार आहे. गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना आयएएस, आयपीएस होण्याचे स्वप्न यामुळे पूर्ण करता येईल.

या यशस्वी विद्यार्थ्यांना एमपीएससी परीक्षेच्या मार्गदर्शन वर्गाचा लाभ घेता येईल. वसतिगृह, २४ तास अभ्यासिका, मार्गदर्शन वर्ग, ग्रंथालय, टेस्ट सिरीज, मेस आदी सुविधांचा लाभ घेणार येणार आहे. गरजू पण होतकरू विद्यार्थ्यांनह स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासाठी आंबेडकरवादी मिशन केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी केले आहे.

## स्वारातीम विद्यापीठात राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष येथे शुक्रवार, दि. २६ जून, २०२६ रोजी राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या प्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, सहायक कुलसचिव रामदास पेद्देवाड, गोविंद हंबर्डे, शैलेश कांबळे, संभाजी धनमने, भगवान रोकडे, बबन हिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## धर्माबाद तालुक्यात 'एसआयआर' अनुषंगाने प्रशिक्षण व साहित्य वितरण कार्यक्रम संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)**– धर्माबाद तालुक्यात एसआयआर अनुषंगाने तालुक्यातील सर्व पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका, रास्त भाव दुकानदार आणि एसआयआर यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणादरम्यान संबंधितांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कामासाठी आवश्यक साहित्याचे वितरण करण्यात आले.

धर्माबाद नगर परिषद सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमास तहसीलदार सुरेखा स्वामी, गट विकास अधिकारी रविराज क्षीरसागर आणि नगर परिषद मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना अधिकाऱ्यांनी सांगितले की, दि. ३० जूनपासून 'बीएलओ' घरोघरी भेटी देणार असून, या कामात सर्व संबंधितांनी बीएलओ यांच्यासोबत उपस्थित राहून आवश्यक ते सहकार्य करावे. तसेच बैठकीस तालुक्यातील सर्व तलाठी आणि ग्राम सेवक उपस्थित होते. त्यांना एसआयआर संदर्भातील कामाची गावपातळीवर व्यापक प्रचार-प्रसिद्धी करण्याच्या तसेच कामात कोणताही अडथळा येणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. कार्यक्रमास संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोकुंदा रेल्वेगेटजवळ साखळी ओढून इंटरसिटी एक्स्प्रेस रोखण्याचे प्रकार वाढले

**किनवट (प्रतिनिधी)** – आदिलाबाद ते नांदेड दरम्यान दररोज धावणाऱ्या इंटरसिटी एक्स्प्रेसला सायंकाळच्या सुमारास गोकुंदा येथील रेल्वे गेटवर साखळी (चेन) ओढून बेकायदेशीरपणे रेल्वेगाडी थांबविण्याच्या प्रकारात वाढ होत आहे. काही समाजकंटकांच्या या कृत्यामुळे गोकुंदा रेल्वे गेटवर दररोज वाहतुकीची कोंडी होत आहे. परिणामी सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रेल्वे प्रशासनाने या समाजविघातक घटकांचा तत्काळ बंदोबस्त करून त्यांना जेरबंद करावे, अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.

चेन ओढून रेल्वेगाडी थांबविण्याच्या हुल्लडबाजीचा मोठा फटका अत्यावश्यक सेवांना बसत आहे. गोकुंदा रेल्वे गेट हे अत्यंत वर्दळीचे ठिकाण असून, रेल्वे अचानक थांबल्याने गेट बराच वेळ बंद राहते. यामुळे अनेकदा गंभीर रुग्णांना घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिका या वाहतूक कोंडीत अडकून पडत आहेत. वेळेवर वैद्यकीय उपचार न मिळाल्यास अशा रुग्णांच्या जीविताला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी किंवा गंमत म्हणून ट्रेन थांबवणाऱ्यांमुळे एखाद्या निष्पाप व्यक्तीचा जीव जाऊ शकतो, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

सायंकाळची वेळ ही नोकरदार, व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांच्या घराकडे परतीची असते. याच मुख्य वेळी इंटरसिटी एक्स्प्रेसची चेन ओढून गाडी उभी केली जात असल्याने गेटच्या दोन्ही बाजूंना शेकडो वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. रेल्वेचे नियम धाब्यावर बसवून चालणाऱ्या या प्रकारामुळे परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

## कै. के. के. रामलू प्रतिष्ठानच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर



**कुंडलवाडी (प्रतिनिधी)** –कै. के. के. रामलू यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कै. के. के. रामलू प्रतिष्ठान, कुंडलवाडीच्या वतीने मंगळवार, दि. ३० जून २०२६ रोजी सकाळी १० ते सायं. ४ या वेळेत शिवम मंगल कार्यालय, कुंडलवाडी येथे मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराचे आयोजन प्रसाद इन्स्टिट्यूट हैदराबाद, भोसले गोपाळराव पाटील आय सेंटर मुधोळ, मुक्तांगण सेवाभावी संस्था धर्माबाद तसेच कै. के. के. रामलू प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरामध्ये अनुभवी नेत्रतज्ज्ञांकडून मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू व इतर नेत्ररोगांचे निदान तसेच आवश्यक रुग्णांची शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात येणार आहे. महाराष्ट्र व तेलंगणा येथील तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन नागरिकांना लाभणार आहे.

कुंडलवाडी शहर व परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्षा सौ. प्रेरणाताई गजानन कोटलवार, उपनगराध्यक्षा सौ. नेहा राकावार, नगराध्यक्ष प्रतिनिधी गजानन कोटलवार, उपनगराध्यक्ष प्रतिनिधी शैलेश राकावार तसेच सर्व नगरसेवकांनी केले आहे. नागरिकांनी या आरोग्य उपक्रमाचा लाभ घेऊन आपल्या डोळ्यांच्या आरोग्याची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## राम कदम यांना पीएच.डी. प्रदान



**नांदेड (प्रतिनिधी)**– मरळक (बु.) येथील रहिवासी राम भोजू कदम यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामार्फत 'अर्थशास्त्र' विषयातील पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे.

संशोधक राम कदम यांनी शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासात निवडक शेतीपूरक व्यवसायाची भूमिका विशेष: संदर्भ हिंगोली जिल्हा (सन २००८-०९ ते २०१८-१९) या विषयावर डॉ. पी. आर. मुठ्ठे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन कार्य पूर्ण केले आहे. त्यांच्या संशोधन कार्याला विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीने मान्यता दिल्यानंतर त्यांना पीएच.डी. पदवी बहाल करण्यात आली. त्यांच्या या यशामुळे यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेशचंद्र शिंदे, उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे, डॉ. कविता सोनकांबळे यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले.

## वैद्य हॉस्पिटलमध्ये 'वय वंदना' शिबिराला प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)** – महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान भारत व सत्तरी ओलांडलेल्या नागरिकांसाठी 'वय वंदना कार्ड' विनामूल्य काढून देण्यात येत असून, त्याकरिता वैद्य रुग्णालयात शिबीर घेण्यात येत आहे. या उपक्रमाला ज्येष्ठ नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे.

सुरुवातीच्या शिबिरांमध्ये मोठ्या प्रमाणावर ज्येष्ठ नागरिक उपस्थित राहत असल्याने सायंकाळी उशिरापर्यंत नोंदणी सुरू ठेवावी लागत होती. अनेक ज्येष्ठ नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन त्यांच्या आग्रहास्तव महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी नियमित शिबीर घेण्याचा निर्णय घेण्यात आला. हे समाजोपयोगी कार्य 'टीम आयुष्मान'ने स्वीकारले असून, या उपक्रमात इंजि. वामनराव गांजरे, इंजि. प्रकाशराव पत्तेवार, इंजि. पद्मजा आलूरकर, सौ. रश्मी वडवळकर, डॉ. हृदयकुमार कौरवार, प्रकाशराव पईतवार, विठ्ठलराव बिडवई आदी मान्यवर सहभागी होत आहेत. आतापर्यंत २,७०० हून अधिक आयुष्मान व वय वंदना कार्डांचे वितरण करण्यात आले असून, त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना कोट्यवधी रुपयांच्या आरोग्य सुविधांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हा उपक्रम भविष्यातही अखंडपणे सुरू राहणार असल्याचे संयोजकांनी सांगितले.

ज्येष्ठ नागरिकांचा प्रतिसाद लक्षात घेऊन अनेक ज्येष्ठ नागरिकांनी आता हे शिबीर महिन्याच्या चारही रविवारी आयोजित करण्याची मागणी केली आहे. या उपक्रमाला उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग, नांदेडच्या वतीने डॉ. हंसराज वैद्य, प्रभाकर कुंटूरकर, गिरीश बाराळे, डॉ. लक्ष्मी पुरणशेट्टीवार, डॉ. पुष्पा कोकीळ, अ‍ॅड. एम. झेड. सिद्दिकी, रामचंद्र कोटलवार तसेच ज्येष्ठ पत्रकार व दलितमित्र माधवराव पवार-काटकळंबेकर यांचे सातत्यपूर्ण सहकार्य लाभत आहे.

## लक्ष्मण पुयडची नवोदय विद्यालयात निवड



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील गोविंदेश्वर प्राथमिक शाळेतील विद्यार्थी आकाश लक्ष्मण पुयड याची प्रतिष्ठित जवाहर नवोदय विद्यालय येथे निवड झाली आहे.

आकाशने आपल्या मेहनती, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गोविंदेश्वर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सचिन दिग्रसकर, शिक्षकवृंद सूर्यकांत जाधव, दिगंबर कल्याणकर, सुग्रीव मोरे, संध्या सिंदगीकर, शोभा किडे, संस्थेचे पदाधिकारी तसेच सर्व विद्यार्थ्यांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. निवृत्त मनपा शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांनी आकाश लक्ष्मण पुयड याचे या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## नांदेडच्या भूमीकन्या कविता जोशी यांचा गौरव




**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्याच्या डीडीआर प्रकल्पाच्या ब्रँड ॲम्बेसेडर तथा महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर येथील शिक्षिका कविता जोशी यांचा नवी दिल्ली येथे केंद्र सरकारच्या वतीने गौरव करण्यात आला.

केंद्रीय संस्कृती मंत्रालयाच्या अखत्यारीतील सांस्कृतिक स्रोत एवं प्रशिक्षण केंद्र, नवी दिल्ली येथे आयोजित सन्मान समारंभात इंदिरा गांधी राष्ट्रीय कला केंद्राचे अध्यक्ष राम बहादुर राय यांच्या हस्ते कविता जोशी यांना मानचिन्ह, सन्मानपत्र आणि राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला.यावेळी केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, सीसीआरटीचे अध्यक्ष डॉ. विनोद नारायण इंदूरकर, संस्कृती मंत्रालयाचे संयुक्त सचिव समर नंदा व कमलेश कुमार मिश्र, निदेशक राजीव कुमार, सीसीआरटीचे संचालक पप्पूंजय कुमार तसेच उपसंचालक डॉ. राहुल कुमार उपस्थित होते.

कविता जोशी यांनी नांदेड, हिंगोली, परभणी, बीड, लातूर आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांतील १५० हून अधिक स्वातंत्र्यसैनिकांच्या जीवनकथा केंद्र सरकारच्या पोर्टलवर सादर केल्या. त्यापैकी १३० हून अधिक कथा पोर्टलवर प्रकाशित झाल्या असून, त्यांचे विविध भारतीय भाषांमध्ये भाषांतरही करण्यात आले आहे.

या कार्यासाठी त्यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांना प्रत्यक्ष भेटी देऊन ऐतिहासिक माहिती, दुर्मीळ कागदपत्रे आणि पुरावे संकलित केले. तसेच हैदराबाद मुक्तीसंग्रामातील अज्ञात नायक, महत्त्वपूर्ण घटना आणि ऐतिहासिक स्थळांचे दस्तऐवजीकरण करून इतिहास जतन करण्याचे मोलाचे कार्य केले. कविता जोशी यांच्या या राष्ट्रीय सन्मानामुळे नांदेड जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या या ऐतिहासिक कार्याचे विविध स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# प्रगतीमंत्र

# करोडोंमध्ये खेळतात इन्व्हेस्टमेंट बँकर्स!



» इन्व्हेस्टमेंट बँकिंग हे एक असे क्षेत्र आहे जिथे सौदे, वेळ आणि वाटाघाटी यांचा थेट रिझल्टवर परिणाम होतो. त्यामुळे, उत्तम संवाद कौशल्ये अत्यावश्यक आहेत.

## 12 वी नंतर कोणता कोर्स निवडावा? सीईओ अशिवनी बजाज यांनी सांगितली फायद्याची गोष्ट

**फायनान्सचा अभ्यास करणारे विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर इन्व्हेस्टमेंट बँकिंगमधील करिअरचा विचार करत आहेत. याची कारणे म्हणजे उच्च पगार, प्रभावी जॉब टायटल आणि मोठ्या, आकर्षक सौद्यांची शक्यता. जरी अनेक विद्यार्थी चांगल्या पगाराच्या आशेने या क्षेत्रात करिअर करतात, तरी इन्व्हेस्टमेंट बँकर्सचे काम आणि त्यांच्यासाठी कोणता कोर्स योग्य आहे हे समजून घेणे महत्त्वाचे आहे...**

सीईओ अशिवनी बजाज यांचा विश्वास आहे, की केवळ संभाव्य कमाईच्या आधारावर हे क्षेत्र निवडणे योग्य नाही. इन्व्हेस्टमेंट बँकरचे मुख्य काम कंपन्यांना भांडवल उभारणी, आयपीओ आणणे, विलीनीकरण आणि मोठ्या आर्थिक सौद्यांवर सल्ला देणे हे आहे. या व्यवसायात यशस्वी होण्यासाठी वित्तशास्त्राचे ज्ञान, तसेच संवाद, वाटाघाटी आणि विश्लेषणात्मक कौशल्यांची आवश्यकता असते. इन्व्हेस्टमेंट बँकिंग करिअर सुरू करणाऱ्यांसाठी असलेले फायदे जाणून घेऊ...



## 12 वीनंतर कोणता अभ्यासक्रम निवडावा?

आर्थिक क्षेत्रात रस असलेल्या विद्यार्थ्यांसाठी चार्टर्ड अकाउंटन्सी (सीए) अभ्यासक्रम केल्याने अकाउंटिंग, टॅक्सेशन, कॉस्टिंग, लॉ आणि ऑडिटिंग यांसारख्या क्षेत्रांमध्ये एक मजबूत पाया मिळतो. जर तुम्हाला बाजारपेठा आणि कोअर फायनान्समध्ये अधिक रस असेल, तर चार्टर्ड फायनान्शियल ॲनालिस्ट (CFA) प्रोग्रामचा विचार करा, ज्यामध्ये इक्विटी, फिक्स्ड इन्कम, अल्टरनेटिव्ह इन्व्हेस्टमेंट्स आणि कॉर्पोरेट फायनान्सचे ज्ञान समाविष्ट आहे. याव्यतिरिक्त उच्चस्तरीय संस्थेतून मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (MBA) केल्याने मार्केटिंग, एचआर, ऑपरेशन्स आणि ऑर्गनायझेशनल बिहेविअर यांसारख्या क्षेत्रांमध्ये तुमची क्षितिजं विस्तारतात, तसेच उत्कृष्ट कॅम्पस प्लेसमेंटच्या संधी आणि व्यावसायिक घडणही मिळते.

## 12 वीनंतर कोणता अभ्यासक्रम निवडावा?

आर्थिक क्षेत्रात रस असलेल्या विद्यार्थ्यांसाठी चार्टर्ड अकाउंटन्सी (सीए) अभ्यासक्रम केल्याने अकाउंटिंग, टॅक्सेशन, कॉस्टिंग, लॉ आणि ऑडिटिंग यांसारख्या क्षेत्रांमध्ये एक मजबूत पाया मिळतो. जर तुम्हाला बाजारपेठा आणि कोअर फायनान्समध्ये अधिक रस असेल, तर चार्टर्ड फायनान्शियल ॲनालिस्ट (CFA) प्रोग्रामचा विचार करा, ज्यामध्ये इक्विटी, फिक्स्ड इन्कम, अल्टरनेटिव्ह इन्व्हेस्टमेंट्स आणि कॉर्पोरेट फायनान्सचे ज्ञान समाविष्ट आहे. याव्यतिरिक्त उच्चस्तरीय संस्थेतून मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन (MBA) केल्याने मार्केटिंग, एचआर, ऑपरेशन्स आणि ऑर्गनायझेशनल बिहेविअर यांसारख्या क्षेत्रांमध्ये तुमची क्षितिजं विस्तारतात, तसेच उत्कृष्ट कॅम्पस प्लेसमेंटच्या संधी आणि व्यावसायिक घडणही मिळते.

## कोट्यवधींपर्यंत पगार पोहोचतो...

इन्व्हेस्टमेंट बँकिंगमधील कारकिर्दीची प्रगती सामान्यतः विश्लेषक (analyst) या पदापासून सुरू होते आणि सहयोगी (associate), उपाध्यक्ष (vice president), संचालक (director) आणि व्यवस्थापकीय संचालक (managing director) या पदांपर्यंत पोहोचते. या प्रवासात जबाबदाऱ्या देखील बदलत जातात. सुरुवातीला, काम पूर्ण करणे आणि विश्लेषण यावर लक्ष केंद्रित केले जाते, तर नंतर ग्राहक व्यवस्थापन, सौदे सुरू करणे आणि व्यवसाय विकास यांसारख्या कामांवर लक्ष दिले जाते. इन्व्हेस्टमेंट बँकिंगमध्ये चांगला पगार मिळतो, पण हे एक आव्हानात्मक क्षेत्रही आहे. यासाठी जास्त तास काम करणे, प्रचंड दबाव आणि सतत शिकत राहणे आवश्यक असते. हे केवळ पैसे कमावण्यापुरते नाही, तर जर तुम्हाला वित्त, व्यवसाय, समस्या सोडवणे आणि लोकांशी संवाद साधण्यात रस असेल तरच हे क्षेत्र निवडले पाहिजे. या क्षेत्रात यश केवळ तेच लोक मिळवतात जे तांत्रिक कौशल्यांसोबतच संवाद कौशल्य, व्यावसायिक समज आणि व्यावहारिक अनुभव यांचा मिलाफ साधतात.

“

**अनेक व्यावसायिकांचा असा विश्वास आहे की सीए, सीएफए आणि एमबीए यांसारख्या पात्रता एकत्र केल्याने एक मजबूत प्रोफाइल तयार होते. हे तांत्रिक ज्ञान आणि कॉर्पोरेट नेतृत्वासाठीच्या तयारीवर लक्ष केंद्रित करते.**

**- अशिवनी बजाज, CEO, लेवरेज्ड ग्रोथ**



# दहावी उत्तीर्ण उमेदवारांसाठी हवाई दलात नवीन भरती

## 7 व्या वेतन आयोगाअंतर्गत उत्तम पगार

**भारतीय हवाई दलात सामील होण्याची ही एक सुवर्णसंधी आहे. सरकारी नोकरीची तयारी करणाऱ्या दहावी उत्तीर्ण उमेदवारांसाठी भारतीय हवाई दलाने मल्टी-टास्किंग स्टाफ (एमटीएस) गट क भरतीसाठी अधिसूचना जारी केली आहे. ऑफलाइन अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून ती २७ जुलै २०२६ पर्यंत सुरू राहील.**




### नोकरी कशी मिळवावी?

हवाई दलातील मल्टी-टास्किंग स्टाफ (MTS) गट 'क' या नागरी पदांसाठी निवड केवळ लेखी परीक्षेवर आधारित असेल. प्रवेशपत्र जारी करण्यापूर्वी अधिकारी वय, शैक्षणिक पात्रता आणि सहाय्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी अर्जांचे पुनरावलोकन करतील. या भरती मोहिमेत मुख्यालय मेंटेनन्स कमांड अंतर्गत MTS पदांसाठी सहा जागा रिक्त आहेत.

### लेखी परीक्षेत काय असेल?

सरकारी नोकरीची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठीच्या लेखी परीक्षेत सामान्य बुद्धिमत्ता आणि तर्कशास्त्र, संख्यात्मक योग्यता, सामान्य इंग्रजी आणि सामान्य ज्ञान यांचा समावेश असेल. प्रश्न-उत्तरांची प्रश्नपत्रिका इंग्रजी आणि हिंदी दोन्ही भाषांमध्ये उपलब्ध असेल. लेखी परीक्षेनंतर निवड झालेल्या उमेदवारांना पडताळणीसाठी अर्ज प्रक्रियेदरम्यान सादर केलेल्या मूळ प्रमाणपत्रांच्या आणि कागदपत्रांच्या प्रती सादर कराव्या लागतील.

### आवश्यक कागदपत्रे...

शैक्षणिक पात्रता, वय, तांत्रिक पात्रता, अनुभव, PwBD स्थिती आणि जात (लागू असल्यास) यासाठीची सहाय्यक कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. OBC अर्जदारांनी वैध नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, तर EWS उमेदवारांनी विहित मालमत्ता प्रमाणपत्र (Asset Certificate) सादर करणे आवश्यक आहे. उमेदवारांनी त्यांचे अर्ज विहित परिशिष्ट-I (Annexure-I) नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. अर्ज इंग्रजी किंवा हिंदीमध्ये टंकलिखित (typed) असावा आणि त्यात अलीकडील स्व-साक्षांकित पासपोर्ट-आकाराचा फोटो समाविष्ट असणे आवश्यक आहे. अर्जदारांनी अर्जावरील फोटोशी जुळणारे आणखी दोन पासपोर्ट-आकाराचे फोटो जोडणे आवश्यक आहे.

### कोण अर्ज करू शकतो?

- » शैक्षणिक पात्रता : मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा मंडळाकडून मॅट्रिक किंवा समकक्ष पात्रता. याव्यतिरिक्त एखाद्या संस्थेत किंवा संस्थानात वॉचमन, गेस्टेटनर ऑपरेटर किंवा माळी म्हणून एक वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.
- » वयोमर्यादा : पात्र उमेदवार किमान १८ वर्षे आणि कमाल २५ वर्षे वयाचे असावेत. वयाची गणना २७ जुलै २०२६ रोजी केली जाईल. सरकारी नियमांनुसार उच्च वयोमर्यादेत सवलत लागू होईल.
- » वेतन : मल्टी-टास्किंग स्टाफ (MTS) पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना लेव्हल १, ७ व्या वेतन आयोगाच्या (7th CPC) वेतन मॅट्रिक्सनुसार प्रीमियम वेतन मिळेल.

### अर्ज कसा करावा?

अर्जदारांनी स्वतःच्या पत्त्याचा लिफाफा सोबत आणणे आवश्यक आहे, ज्यावर १० चा स्टॅम्प लावून पद आणि प्रवर्ग स्पष्टपणे नमूद केलेला असावा. जाहिरात प्रसिद्ध होण्यापूर्वी किंवा अंतिम मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. पूर्ण भरलेले अर्ज कमांडंट, आयएएम, आयएएफ, विमानपुरा पो.ओ., बंगळूर – ५६००१७ या पत्त्यावर पाठवावेत. भारतीय हवाई दलाने म्हटले आहे की टपालाच्या विलंबासाठी ते जबाबदार नाहीत.




# खिशात एकेकाळी रुपयाही नव्हता, आता उभारली 285 कोटी रुपयांची कंपनी!

**असे म्हटले जाते की कठोर परिश्रम, समर्पण आणि योग्य विचारांनी कोणीही आपले नशीब बदलू शकतो. उत्तर प्रदेशातील गाझियाबादमधील सपनावत या छोट्या गावातून येऊन एक मोठी घरगुती उपकरणे कंपनी उभी करणाऱ्या राजीव कुमार गुप्ता यांची कहाणी याचे उत्तम उदाहरण आहे. आज ते थर्मोकूल होम अप्लायन्सेस लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक आहेत. त्यांच्या कंपनीची उलाढाल अंदाजे ३०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.**

राजीव गुप्ता यांचा जन्म गाझियाबादमधील एका साध्या ग्रामीण कुटुंबात झाला. त्यांचे सुरुवातीचे आयुष्य अत्यंत साध्या आणि शिस्तबद्ध वातावरणात गेले. लहानपणापासूनच ते वडिलांना त्यांच्या कामात मदत करू लागले. त्यांचे वडील किराणा मालाचे दुकान चालवत असत. असेही दिवस होते जेव्हा त्यांच्या खिशातही पैसे नसायचे.



### 1992 मध्ये थर्मोकूलची स्थापना

१९९० च्या दशकाच्या सुरुवातीला भारताची ग्राहक बाजारपेठ झपाट्याने बदलत होती. याच काळात राजीव गुप्ता यांनी १९९२ मध्ये गाझियाबाद येथे थर्मोकूलची स्थापना केली. पहिल्या पिढीतील उद्योजक म्हणून त्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. व्यवसाय सुरू करण्यासाठी त्यांच्याकडे खूप मर्यादित संसाधने होती. त्या वेळी, मजबूत डीलर नेटवर्क आणि भरीव बजेट असलेल्या मोठ्या ब्रँड्सचे बाजारपेठेत आधीच वर्चस्व होते. एका नवीन आणि अनोळखी ब्रँडसाठी वितरक आणि किरकोळ विक्रेत्यांमध्ये स्वतःचे स्थान निर्माण करणे हे एक मोठे आव्हान होते.

### ग्राहक समाधान सर्वोच्च

राजीव गुप्ता यांनी गुणवत्ता किंवा ग्राहकांच्या विश्वासाशी कधीही तडजोड केली नाही. त्यांचा विश्वास होता की, जर ग्राहकांना योग्य किमतीत सर्वोत्तम उत्पादने मिळाली, तर ब्रँडची नक्कीच वाढ होईल. सुरुवातीला एअर कूलर आणि पंखे बनवणाऱ्या थर्मोकूलने हळूहळू आपल्या उत्पादनांचा विस्तार केला. आज ही कंपनी वॉशिंग मशीन, गिझर, रेफ्रिजरेटर, एलईडी टीव्ही आणि स्वयंपाकघरातील उपकरणांसह विविध प्रकारची उत्पादने बनवते. कंपनीची वार्षिक उलाढाल २८५ कोटी (अंदाजे ३०० कोटी) आहे. कंपनीने उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान आणि मध्य प्रदेशसह अनेक राज्यांच्या शहरी आणि निमशहरी बाजारपेठांमध्ये आपले मजबूत स्थान निर्माण केले आहे. भविष्यात भारतीय घरगुती उपकरण उद्योगात आपला बाजारहिस्सा २० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे थर्मोकूलचे उद्दिष्ट आहे.

## जगाच्या कोणत्या शहरांत सर्वाधिक अब्जाधीश? 3 भारतीय शहरांचाही समावेश

तुम्हाला माहीत आहे का जगात कोणत्या शहरात सर्वाधिक अब्जाधीश आहेत? हुरुन ग्लोबल रिच लिस्ट २०२६ नुसार अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात जगात सर्वाधिक १४६ अब्जाधीश आहेत. जगात सर्वाधिक अब्जाधीश असलेल्या ३२ शहरांपैकी १८ शहरे आशियामध्ये आहेत. यामध्ये चीनचा वाटा ३४% आहे. न्यूयॉर्कनंतर चीनमधील शेनजेन शहरात १३२ अब्जाधीश असून ते दुसऱ्या क्रमांकावर आहे. चीनमधील शांघायमध्ये १२० अब्जाधीश आहेत, तर बीजिंगमध्ये १०७ आहेत. ब्रिटनची राजधानी लंडनमध्ये १०२ अब्जाधीश आहेत, तर भारताची आर्थिक राजधानी मुंबईमध्ये ९५ अब्जाधीश आहेत. भारताची राजधानी दिल्लीमध्ये ६४ अब्जाधीश आहेत. भारताची आयटी राजधानी बंगळूरुमध्ये ३० अब्जाधीश आहेत.

# 'बीएसएनएल'कडून ज्युनियर टेलिकॉम ऑफिसर भरतीची घोषणा

## फ्रेशर्सना चांगला मासिक पगारही मिळेल...

**भारत सरकारची दूरसंचार कंपनी असलेल्या बीएसएनएलमध्ये अधिकारी बनण्याची ही एक उत्तम संधी आहे. कंपनीने ओपन मार्केट ज्युनियर टेलिकॉम ऑफिसर (जेटीओ) पदांसाठी भरतीची घोषणा केली आहे. इंटर्नल आणि एक्सटर्नल सर्व प्रकारचे उमेदवार करू शकतात. externalexam.bsnl.co.in या अधिकृत वेबसाइटवर ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. याची अंतिम तारीखही लवकरच जाहीर होणार आहे. त्यामुळे या भरती प्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांनी तात्काळ अर्ज करावा. या भरती मोहिमेद्वारे, बीएसएनएल ज्युनियर टेलिकॉम ऑफिसरच्या १०० पदांसाठी उमेदवारांची निवड करणार आहे. निवड प्रक्रियेमध्ये लेखी परीक्षेचा समावेश आहे. त्यामुळे अनुभवाशी संबंधित कोणत्याही पात्रतेची आवश्यकता नाही. कोणताही कामाचा अनुभव नसलेले नवीन उमेदवारदेखील या भरतीचा भाग होऊ शकतात.**

### भरतीसाठी कोण अर्ज करू शकतो?

- » शैक्षणिक पात्रता : मान्यताप्राप्त विद्यापीठातून टेलिकम्युनिकेशन/ इलेक्ट्रॉनिक्स/ रेडिओ/ कॉम्प्युटर/ इलेक्ट्रिकल/ माहिती तंत्रज्ञान/ इन्स्ट्रुमेंटेशन यापैकी कोणत्याही शाखेत बी.ई./बी.टेक. किंवा समकक्ष पदवी असलेले उमेदवार जेटीओ (JTO) भरतीसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) किंवा एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) असलेले उमेदवार देखील पात्र आहेत. एम.टेक. पदवी असलेले उमेदवार देखील पात्र आहेत.
- » वयोमर्यादा : उमेदवारांचे वय किमान २० वर्षे आणि कमाल ३० वर्षे असणे आवश्यक आहे. राखीव प्रवर्गातील उमेदवारांना नियमानुसार वयामध्ये सवलत दिली जाईल.

### अर्ज कसा करावा?

- » सर्वप्रथम, www.externalexam.bsnl.co.in या अधिकृत वेबसाइटला भेट द्या. आता, तुमचा मोबाईल नंबर आणि ईमेल वापरून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करा. पडताळणीसाठी तुम्हाला दोन्ही बाजूंनी एक ओटीपी (OTP) मिळेल. यानंतर, लॉग इन करा आणि अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करा. तुमचे नाव, पालकांची नावे, वय, प्रवर्ग, १०वी, १२वी, पदवी आणि पदव्युत्तर पदवी प्रविष्ट करा. यानंतर, एक मंडळ (सर्कल) निवडा. तुमच्या आवडीनुसार २१ मंडळांमधून तुमची पसंती निवडा. पासपोर्ट आकाराचा फोटो आणि सही यांसारखी कागदपत्रे २० केबी ते ५० केबी या फॉरमॅटमध्ये अपलोड करा. तुम्हाला तुमची १० वीची गुणपत्रिका, पदवी, आरक्षण प्रमाणपत्र इत्यादी देखील अपलोड करावे लागतील. संपूर्ण अर्ज योग्यरित्या भरल्यानंतर, तुमच्या प्रवर्गानुसार अर्ज भरा आणि त्याची प्रिंट काढा.






### अर्ज शुल्क किती?

- » अनारक्षित/ ओबीसी/ ईडब्ल्यूएस (OBC/EWS) उमेदवारांना या भरतीसाठी अर्ज करण्यासाठी २००० अर्ज शुल्क ऑनलाइन भरावे लागेल. एससी/एसटी/पीडब्ल्यूबीडी (SC/ST/PwBD) उमेदवारांसाठी शुल्क १००० आहे. For any other information related to this recruitment, candidates can visit the official website of BSNL.

# पंतप्रधान मोदी सेशेल्सचा सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानीत!

## ■ पर्यावरण संवर्धनातील नेतृत्त्वासाठी पुरस्कार प्रदान



**सेशेल्स(वृत्तसंस्था)**–पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पर्यावरण संवर्धन, हवामान बदलावर प्रभावी नेतृत्व आणि शाश्वत विकासासाठी दिल्या जाणाऱ्या सेशेल्सच्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविण्यात आले आहे. पर्यावरण संरक्षण, ब्लूइकॉनॉमी आणि हवामान कृती क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सेशेल्स सरकारने दिलेल्या राष्ट्रपती प्रशस्तीपत्रात पंतप्रधान मोदी यांनी शाश्वत विकास, हरित अर्थव्यवस्था, समुद्री संसाधनांचे जबाबदारीने व्यवस्थापन आणि हवामान बदलाचा सामना करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे विशेष कौतुक करण्यात आले आहे. तसेच लहान बेट राष्ट्रांना दिलेल्या पाठबळामुळे भारत आणि सेशेल्स यांच्यातील द्विपक्षीय संबंध अधिक दृढ झाल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे.

**‘हा सन्मान हवामान बदलाशी लढणाऱ्या सर्व देशांना समर्पित’**

हा सन्मान स्वीकारल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ‘द’ वर भावना व्यक्त करत म्हटले, हा सन्मान मिळाल्याने मी नम्र झालो आहे. हा पुरस्कार मी हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करणाऱ्या आणि भावी पिढ्यांसाठी पर्यावरण संरक्षणाला आपली जबाबदारी मानणाऱ्या जगातील सर्व देशांना समर्पित करतो.

पर्यावरण आणि शाश्वत विकास क्षेत्रातील योगदानासाठी पंतप्रधान मोदींना मिळालेला हा आणखी एक महत्त्वाचा आंतरराष्ट्रीय सन्मान आहे. यापूर्वी मे २०२६ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेने अन्नसुरक्षा, कृषी क्षेत्रातील परिवर्तन आणि शाश्वत शेतीला चालना दिल्याबद्दल त्यांना प्रदान केला होता.

तसेच २०१८ मध्ये दक्षिण कोरियाचा प्रतिष्ठेचा आणि त्याच वर्षी संयुक्त राष्ट्रांचा पर्यावरण क्षेत्रातील सर्वोच्च हा पुरस्कारही पंतप्रधान मोदींना मिळाला होता. हवामान बदलाविरोधातील नेतृत्व आणि जागतिक पर्यावरणीय सहकार्याला चालना दिल्याबद्दल त्यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले होते.

सेशेल्सकडून मिळालेला हा सर्वोच्च सन्मान भारताच्या पर्यावरणपूरक विकास धोरणाला आणि हवामान बदलाविरुद्धच्या जागतिक प्रयत्नांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला मिळालेली आणखी एक मोठी आंतरराष्ट्रीय मान्यता मानली जात आहे. पर्यावरण संरक्षण, हरित विकास आणि समुद्री परिसंस्थेच्या संवर्धनासाठी भारताने घेतलेल्या पुढाकाराचेही या पुरस्कारातून कौतुक करण्यात आले आहे.

# यूपीएससीची कारवाई; एआय तपासणीत परीक्षेपूर्वीच ६०० बनावट अर्ज बाद




**नवीदिल्ली(वृत्तसंस्था)**– केंद्रीय लोकसेवा आयोगाने सिव्हिल सेवा परीक्षा २०२६ अधिक पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त करण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. यंदा प्रथमच कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित पडताळणी प्रणालीचा वापर करून परीक्षेपूर्वीच सुमारे ६०० संशयास्पद अर्ज रद्द करण्यात आले.

यापूर्वी अनेक गैरप्रकार मुलाखत किंवा अंतिम निवड टप्प्यात उघडकीस येत असत. मात्र, यंदा अर्ज प्रक्रियेच्या सुरुवातीलाच एआयच्या मदतीने डुप्लिकेट आणि बनावट अर्जांची ओळख पटवून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. त्यामुळे प्रामाणिक उमेदवारांसाठी अधिक निष्पक्ष (त्रुटी) स्पर्धेचा मार्ग मोकळा झाला आहे.

यूपीएससीचे अध्यक्ष अजय कुमार यांनी सांगितले की, अर्ज प्राप्त झाल्यानंतर ‘डी-डुप्लिकेशन’ मोहीम राबवण्यात आली. या प्रक्रियेत प्रत्येक उमेदवाराची खरी ओळख तपासण्यात आली. एकापेक्षा अधिक अर्ज करणारे, चुकीची माहिती देणारे किंवा बनावट ओळख वापरणारे उमेदवार एआय प्रणालीद्वारे शोधण्यात आले.

यंदा प्रथमच प्राथमिक परीक्षा होण्यापूर्वीच संशयास्पद अर्जांवर कारवाई करण्यात आली. माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या ख प्रणालीमुळे बनावट उमेदवारांना पुढील टप्प्यापर्यंत पोहोचणे शक्य होणार नाही.

२०२४ मधील पूजा खेडकर प्रकरणानंतर णझडउने परीक्षा प्रक्रिया अधिक कडक केली आहे. त्या पार्श्वभूमीवर यंदा आधार आधारित पडताळणी, लाइव्ह फोटो, फेस मॅचिंग आणि एआय आधारित डी-डुप्लिकेशन प्रणाली लागू करण्यात आली.

एआय प्रणालीने अर्जदारांचे नाव, आई-वडिलांचे नाव, जन्मतारीख, छायाचित्र आणि मागील १५ वर्षांच्या नोंदींची तुलना करून पडताळणी केली. या तपासणीनंतर नियमांचे उल्लंघन करणारे सुमारे ६०० अर्ज रद्द करण्यात आले.

# रिलायन्स इंडस्ट्रीकडून तिरूपतीच्या बालाजी मंदिराला २७ कोटींची भेट



**तिरुपती (प्रतिनिधी)** –आशियातील सर्वात श्रीमंत उद्योगपतींपैकी एक असलेल्या मुकेश अंबानी यांचे सुपुत्र आणि रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे कार्यकारी संचालक अनंत अंबानी सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय बनले आहेत. अनंत अंबानी यांनी रविवार, २८ जून रोजी तिरुमला येथील भगवान व्यंकटेश्वर (बालाजी) मंदिराला भेट दिली. त्यांनी सकाळच्या सुप्रभजन सेवेत भाग घेतला आणि आपली लांबलचक केशभूषा देवाच्या चरणी अर्पण केले. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तीने देवाला आपले केस अर्पण करून आपल्या अहंकाराचा त्याग केला. याबाबत सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली आहे.दर्शनानंतर मंदिरातील रंगनायकुला मंडपम येथे वैदिक विद्वानांनी अनंत अंबानी यांना ‘वेदाशीर्वचनम्’ देऊन आशीर्वाद दिला. तसेच तिरुमला तिरुपती देवस्थानमच्या वतीने त्यांना श्रीवारी तीर्थप्रसाद आणि मानाची रेशमी शाल देऊन सन्मानित करण्यात आले.

या भक्तीमय प्रसंगी अनंत अंबानीने तिरुपतीच्या देवस्थानासाठी एक मोठा घोषणा केली. रिलायन्सकडून देवसथानला सुमारे २७ कोटी रुपये किमतीच्या २५ आधूनिक इलेक्ट्रिक बस दान करण्यात येणार आहेत. या बसेस चालवण्यासाठी लागणाऱ्या ५० ड्रायव्हर्सचा पगार आणि इतर सुविधाही कंपनीतर्फे केले जाणार आहे. याशिवाय तिरुमलामध्ये या बसेसच्या सुलभ वाहतुकीसाठी आवश्यक ईव्ही चार्जिंग स्टेशन्स उभारण्यासही त्यांनी पूर्ण पाठिंबा दर्शवला आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्ग प्रकल्पाची पाहणी

**पालघर(प्रतिनिधी)**–भारत सरकारमार्फत सुमारे १ लाख कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणारा सुमारे १,४०० किलोमीटर लांबीचा, ८ पदरी ग्रीनफिल्ड क्सेस-कंट्रोल्ड द्रुतगती मार्ग हरियाणा, राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र या पाच राज्यांना जोडणार आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर दिल्ली आणि मुंबई दरम्यानचा प्रवास मोठ्या प्रमाणात वेगवान होणार असून देशातील प्रमुख औद्योगिक पट्ट्यांमधील संपर्क अधिक सक्षम होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

देशातील सर्वात महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक असलेल्या दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गाच्या (वडोदरामुंबई विभाग) कामांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी करून प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करत त्यांनी प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासह दर्जेदार कामांवर भर देण्याच्या सूचना दिल्या.

या प्रकल्पाचे वैशिष्ट्ये म्हणजे जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण यांच्याशी थेट जोडणी. त्यामुळे उत्तर भारतातून जेएनपीएपर्यंत मालवाहतूक अधिक जलद, कार्यक्षम आणि कमी खर्चात होणार असून देशाच्या लॉजिस्टिक साखळीला मोठी बळकटी मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील वडोदरा-मुंबई विभाग सुमारे १५७ किलोमीटर लांबीचा असून, त्यासाठी सुमारे २४ हजार कोटी रुपये खर्च करण्यात येत आहे. सात बांधकाम पॅकेजमध्ये विकसित होणाऱ्या या विभागातील पाच पॅकेजचे काम पूर्ण झाले असून ते वाहतुकीसाठी सज्ज आहेत, तर उर्वरित दोन पॅकेज ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे. महाराष्ट्र राज्यातून जाणारा मार्ग ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

हा मार्ग सुरू झाल्यानंतर वडोदरा ते मुंबई प्रवासाचा कालावधी आठ तासांवरून सुमारे चार तासांपर्यंत कमी होणार आहे. यामुळे प्रवाशांना वेगवान, सुरक्षित आणि वाहतूक कोंडीमुक्त प्रवासाचा अनुभव मिळणार असून व्यावसायिक वाहतुकीलाही मोठी चालना मिळेल.

जेएनपीएकडे जाणाऱ्या मालवाहतुकीची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढणार आहे. सध्या ठाणे, भिवंडी आणि घोडबंदर मार्गावरील वाहतूक कोंडीमुळे होणारा वेळ व इंधनाचा अपव्यय कमी होऊन मालवाहतुकीसाठी अधिक जलद आणि विश्वासार्ह पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे.

उत्तर आणि पश्चिम भारतातील औद्योगिक क्षेत्रांना मुंबईच्या बंदर व्यवस्थेशी अधिक सक्षम जोडणी मिळाल्याने निर्यात, उद्योग, गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळणार आहे. तसेच हा प्रकल्प देशाची राजधानी दिल्ली आणि आर्थिक राजधानी मुंबई यांना अधिक वेगवान व आधुनिक द्रुतगती मार्गाने जोडणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असून, भारताच्या पायाभूत सुविधा विकास आणि आर्थिक प्रगतीमध्ये मोलाचे योगदान देणारा ठरणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार स्नेहा दुबेपंडित ,आमदार राजन नाईक तसेच कोकण विभागाचे पोलीस महानिरीक्षक चंद्रकिशोर मीना, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष कार्यकारी संचालक दीपक कपूर , गछ्झ चे अध्यक्ष गौरव दयाल, मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्त निकेत कौशिक, जिल्हाधिकारी डॉ.इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, पोलीस अधीक्षक यतीश देशमुख, डहाणू प्रकल्प अधिकारी विशाल खत्री तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## जाहीर प्रगटनाचे उत्तर व खुलासा

माझे पक्षकार संपत्ती सुरेश काकडे व इतर रा. नांदेड यांनी दिलेल्या अधिकार, कागदपत्रे व सुचनेंवरून गोविंद काशिनाथ जाधव यांचे मार्फत ॲड. ओंकार जयवंतराव कुर्तडीकर यांच्या मार्फत देण्यात आलेल्या जाहीर प्रगटनास खालीलप्रमाणे उत्तर व खुलासा करण्यात येतो की,

१. हे की, माझे पक्षकार संपती सुरेश काकडे, राधा भ्र. सुभाष पवार आणि आशाबाई भ्र. काशिनाथ जाधव हे आपसात सख्या बहिणी व आई आहेत. तसेच जाहीर प्रगटन देणार गोविंद काशिनाथ जाधव हे आमच्या पक्षकाराचा भाऊ व मुलगा आहे.

२. हे की, आमचे पक्षकाराचे मौजे मालदा, ता. जि. नांदेड येथे गट नं. १० मध्ये क्षेत्र २ हे. ५० आर पैकी ५३ आर या जमिनीचे मालक व कब्जेदार असून सदर मालमत्ता ही आमचे पक्षकारास त्यांचे वडील काशिनाथ जाधव यांनी त्यांच्या हयातीत वाटणी करुन दिली आहे व आमचे पक्षकाराचे भाऊ गोविंद काशिनाथ जाधव यांनाही त्यांच्या अधिकाराप्रमाणे जमीन देण्यात आली होती.

३. हे की, सदर गोविंद काशिनाथ जाधव यांनी त्यांच्या हिश्यात आलेल्या मालमत्तेची विल्हेवाट लावून सदर जमीन विक्री केली आहे. त्यामुळे त्यांचा उपरोक्त जमीन गट नं. १० शी कसल्याही प्रकारचा हक्क वा संबंध नाही. परंतु त्यांनी माझे पक्षकारास त्रास देण्याच्या वाईट उद्देशाने प्रेरीत होऊन सदरचा दिवाणी दावा, दिवाणी न्यायालय येथे दाखल केला आहे. वास्तविक पाहता त्यांचा उपरोक्त जमिनीशी कसल्याही प्रकारचा हक्क वा संबंध नाही, परंतु त्यांनी क्लुषित बुध्दीने व खोडसाळपणे सदरचे प्रगटन दिले आहे. त्यामुळे माझे पक्षकार गोविंद काशिनाथ जाधव यांना असे आवाहन करतात की, त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन तात्काळ परत घ्यावे व त्याची जाहीर दिलगिरी व्यक्त करावी अन्यथा आमचे पक्षकार पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करतील त्यास गोविंद जाधव हेच जबाबदार असतील याची नोंद घ्यावी.

करिता हा जाहीर खुलासा व उत्तर.

मार्फत
**ॲड. एस. एस. देशमुख**

जाहीर खुलासा देणार
**संपती सुरेश काकडे**
रा. नांदेड

# केतन अग्रवाल हत्या प्रकरण: लोहगडावर सिया गोयलकडून पोलिसांनी केले सीन रिक्रिएशन



**पुणे (प्रतिनिधी)**–पुण्यातील उद्योजक केतन अग्रवाल हत्या प्रकरणाचा तपास अधिक वेगाने सुरू असून, पुणे ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणात महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. तपासाचा भाग म्हणून मुख्य आरोपी सिया गोयलला लोहगड किल्ल्यावर नेऊन घटनास्थळी सीन रिक्रिएशन करण्यात आले. या प्रक्रियेद्वारे घटना नेमकी कशी घडली, याची पडताळणी पोलिसांनी केली.

मिळालेल्या माहितीनुसार शनिवारी सकाळी पोलिसांनी सियाला लोहगडावर नेले. ज्या ठिकाणावरून केतन अग्रवाल खाली पडल्याचा आरोप आहे, त्या ठिकाणी सियाकडून संपूर्ण घटनाक्रम पुन्हा उभा करण्यात आला. यावेळी पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, वरिष्ठ अधिकारी आणि फॉरेन्सिक तज्ज्ञ उपस्थित होते.

तपासादरम्यान सियाने घटनास्थळी जाण्यासाठी वापरलेला मार्गही पोलिसांना दाखवला. त्यानंतर डमी बॉडीच्या मदतीने घटनेचे सीन रिक्रिएशन करण्यात आले. पोलिसांनी सियाला त्या वेळी काय घडले, हे प्रत्यक्ष दाखवण्यास सांगितले. या प्रक्रियेतील प्रत्येक हालचाल आणि निरीक्षणाची नोंद तपास पथकाने केली आहे.

या प्रकरणात सिया गोयल आणि चेतन चौधरी यांची चौकशी सुरू असून त्यातून अनेक महत्त्वाचे तपशील समोर येत आहेत. यापूर्वी पोलिसांनी सियाच्या आई-वडिलांचीही दीर्घकाळ चौकशी केली होती. तपास यंत्रणा आरोपींचे जबाब, तांत्रिक पुरावे, कॉल रेकॉर्ड, फॉरेन्सिक अहवाल आणि घटनास्थळावरील माहिती यांची सखोल पडताळणी करत आहे.

केतन अग्रवाल हत्या प्रकरणातील तपास अंतिम टप्प्याकडे जात असून सीन रिक्रिएशनमधून मिळालेली माहिती तपासासाठी महत्त्वाची ठरणार आहे. सर्व पुराव्यांचा अभ्यास केल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

# कृषी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन

**मुंबई (प्रतिनिधी)** –हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या कृषी दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत दि. १ जुलै २०२६ रोजी डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी, मुंबई-१८ येथे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यात सन २०२३ व २०२४ या वर्षांतील राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरण करण्यात येणार असून कृषी, कृषी संलग्न क्षेत्र, फलोत्पादन, सेंद्रिय शेती, कृषी विस्तार व कृषी विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एकूण १८९ शेतकरी, संस्था व कृषी अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.

# परदेशात २५ मराठी तरुणांचे हाल; बीडच्या तरुणाने केला रॅकेटचा पर्दाफाश




**बीड(प्रतिनिधी)**– परदेशात मोठ्या पगाराच्या नोकरीचे आमिष दाखवून महाराष्ट्रातील २५ तरुणांची मानवी तस्करी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. थायलंड आणि म्यानमार सीमेवरील कुख्यात ’गोल्डन ट्रँगल’ परिसरात या तरुणांना ओलीस ठेवण्यात आले असून, त्यांच्यावर अमानुष अत्याचार केले जात आहेत. बीडमधील एका पीडित तरुणाने जीवावर उदार होऊन केलेल्या फोनमुळे या आंतरराष्ट्रीय सायबर फसवणुकीच्या रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे.

चांगल्या पगाराच्या नोकरीच्या आमिषाला बळी पडून महाराष्ट्रातील विविध भागांतील २५ तरुण थायलंड आणि म्यानमारला गेले होते. मात्र, तिथे पोहोचल्यानंतर त्यांना प्रत्यक्षात म्यानमार-थायलंड-लाओस सीमावर्ती भागात असलेल्या ’गोल्डन ट्रँगल’ परिसरात डांबून ठेवण्यात आले आहे.

**बीड सायबर पोलिसांची कारवाई**

बीडमधील एका तरुणाने मोठ्या धैर्याने आपल्या कुटुंबीयांना फोन करून ही परिस्थिती सांगितली. या माहितीच्या आधारे बीड सायबर पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल केला असून, या आंतरराष्ट्रीय रॅकेटचा तपास सुरू केला आहे. बीड पोलिसांच्या या कारवाईमुळे या मानवी तस्करीच्या गंभीर प्रकारावर प्रकाश पडला आहे.

अवैध मार्गाने किंवा आमिषांना बळी पडून परदेशात नोकरीसाठी जाणाऱ्या तरुणांसाठी ही घटना एक मोठा इशारा आहे. सध्या या तरुणांची सुटका करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर हालचाली सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

**Change In Name**

My Old Name is SAMINA SHAIKH RAFIQ MOHAMMED KHURSHEED AHMAD BILQIS BANO SHAIKH RAFIQ which now I am changing as New Name SAMINA KHURSHEED SHAIKH RAFIQ. Henceforth all my correspondence will be done as per my new name. Please consider the same. **Address**-C/o Shaikh Rafiq, 6-3-206 Maniyar Galli Road Near Old Itwara Police Station Dhangar Tekdi, Nanded-431604(MS) India Mo. NO.: 9423138577

**Change In Name**

My Old Name is SHAIKH BILAL AKMAL SHAIKH RAFEEQUE SAMINA SHAIKH RAFEEQUE which now I am changing as New Name SHAIKH BILAL AKMAL SHAIKH RAFIQ. Henceforth all my correspondence will be done as per my new name. Please consider the same. **Address**-C/o Shaikh Rafiq, 6-3-206 Maniyar Galli Road Near Old Itwara Police Station Dhangar Tekdi, Nanded-431604(MS) India Mo. NO.: 9423138577

**Change In Name**

My Old Name is BUSHRA AKMAL RAFIQUE AKMAL SAMEENA which now I am changing as New Name BUSHRA AKMAL SHAIKH RAFIQ. Henceforth all my correspondence will be done as per my new name. Please consider the same. **Address**-C/o Shaikh Rafiq, 6-3-206 Maniyar Galli Road Near Old Itwara Police Station Dhangar Tekdi, Nanded-431604(MS) India Mo. NO.: 9423138577

**Change In Name**

My Old Name is DROPADA GANPATRAO SURYAWANSHI which now I am changing as New Name SUREKHA SUNIL DAWANE. Henceforth all my correspondence will be done as per my new name. Please consider the same. **Address**-SUREKHA SUNIL DAWANE Plot No. 71/B Shrikrishna Nagar Taroda Bk. Nanded Tq. Nanded. Dist. Nanded-431605 Mo. No. 9403524555

**Change In Name**

My Old Name is LAXMI KHUSHAL TUPDALE which now I am changing as New Name LAXMIBAI KHUSHAL TUPDALE. Henceforth all my correspondence will be done as per my new name. Please consider the same. **Address**-LAXMIBAI KHUSHAL TUPDALE W/O KHUSHAL TUPDALE At Post Naigaon, Tq. Naigaon, Dist. Nanded, PIN CODE 431709 Mo. NO.: 9011729244

**Change In Name**

My old name is MD AFZAL RAFIK which is now i am changing New name AFZAL RAFIQ SHAIKH hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name. **Address :** 1-1-111, MADINA NAGAR RAILWAY STATION, MUDKHED, NANDED, MAHARASHTRA 431806 Mobile No 9552616080

**Change In Name**

My old Name is MOHAMMED REHAN which is now i am changing New name MOHAMMED REHAN ABDUL RASHEED hence forth my all correspondence will be done as per my new name, please consider the name. **Address** : 2-5-46 ISLAMPURA TQ MUDKHED, NANDED, MAHARASHTRA 431806 **Mo. No 7499300340**



रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# महापालिकेतर्फे पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेस सुरुवात

## ♦ ५ वर्षांखालील बालकांना डोस देण्याचे महापौर सौ. कविता मुळे यांचे आवाहन



**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेच्यावतीने ५ वर्षांखालील सर्व बालकांसाठी पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ महापालिकेच्या जंगमवाडी येथील आरोग्य केंद्रात करण्यात आला. शहरात एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहू नये यासाठी नांदेडच्या पालकांनी आपल्या पाल्यांना पोलीओ लस द्यावी, असे आवाहन महापौर कविता मुळे यांनी केले. याप्रसंगी उपमहापौर दीपकसिंह रावत यांची प्रमुख उपस्थिती होती.

या मोहिमेंतर्गत ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पोलिओचे 'दोन थेंब' पाजणे आवश्यक असून, पोलिओमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी पालकांनी स्वतःहून पुढे यावे, असे आवाहन यावेळी महापौरांनी केले

शहरातील सर्व शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रं आणि अंगणवाड्यांमध्ये पोलिओ डोस उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे बसस्थानक, रेल्वे स्टेशन आणि मुख्य चौकांमध्ये विशेष बुथ कार्यरत असून, मोहिमेच्या पहिल्या दिवशी सुटलेल्या बालकांसाठी आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन मोहीम राबवली जाईल. पोलिओ हा एक घातक आजार असून, केवळ नियमित लसीकरणामुळेच त्याचे समूळ उच्चाटन करणे शक्य आहे. त्यामुळे आपल्या घरातील आणि परिसरातील ५ वर्षांखालील प्रत्येक बालकाला जवळच्या पोलिओ केंद्रावर नेऊन डोस नक्की द्यावा, असे आवाहन महापौर सौ. मुळे आणि महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

याप्रसंगी महिला व बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, आरोग्य उपसमितीचे अध्यक्ष डॉ. अंकुश देवसरकर, अतिरिक्त आयुक्त निलेश सुकेवार, उपायुक्त अजितपालसिंघ संधु, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिठ्ठे, लसीकरण अधिकारी डॉ. बालाप्रसाद कुंटूरकर, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. मो. बदिओदिन आदी उपस्थित होते.

# गुरुद्वारा बोर्ड कलमाच्या स्थगितीप्रकरणी शिष्टमंडळ आ. चिखलीकरांना भेटले



**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील हजुरी संगत सचखंड गुरुद्वारा बोर्ड नांदेड कायदा १९५६ कायम ठेवून कलम ११ रद्द करण्यासाठी शीख समाजाच्या शिष्टमंडळाने आ. प्रताप पाटील चिखलीकर यांना भेटून निवेदन सादर केले.

शीख समाजाच्या शिष्ट–मंडळाकडून आमदार चिखलीकर यांनी सविस्तर माहिती जाणून घेतली. १९५६ चा कायदा कायम ठेवावा व कलम ११ संशोधन रद्द करावे, अशी मागणी शिष्टमंडळाने यावेळी केली.

या विषयी येत्या सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार व सर्व मंत्रिमंडळासमोर हा विषय ठेवून जो १९५६ चा कायदा आहे तो कायम ठेवण्यात येईल व कलम ११ संशोधन रद्द करण्यासाठी चर्चा करू, असा विश्वास आमदार चिखलीकर यांनी शिष्टमंडळाला दिला.

यावेळी सचखंड गुरुद्वारा बोर्ड नांदेडचे माजी सचिव सरदार रवींद्रसिंग बुंगई, रविंदरसिंग पुजारी, संदीपसिंग गाडीवाले, दर्शनसिंग सिद्धू, दिलीपसिंग सोडी, प्रतापसिंग खालसा, दीपकसिंग गल्लीवाले, राजिंदरसिंग शाहू, अवतारसिंग पहरेदार, देवेंदरसिंग मोटारवाले, जगजीतसिंग खालसा व नांदेड हजुरी शीख समाजाच्या प्रतिनिधींचा समावेश होता.

# अवैध रेती वाहतूकप्रकरणी ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल; ७२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड ग्रामीण पोलिसांनी छापा कारवाई करुन अवैध रेती वाहतूक करणाऱ्या रेती माफियांवर एकूण–५ आरोपीतांविरुद्ध २ गुन्हे दाखल केले. या कारवाईत ७२ हाजाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

जिल्ह्यात अवैध वाळू वाहतुकीवर व अवैध धंद्याला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली एका पथकाने प्रभावी कारवाई करत अवैध वाळू वाहतूक करणारा एक हायवा पकडला. तसेच गोदावरी घाटावर कारवाई करीत बोट, इंजीन, तराफे जप्त केले.

शनिवार, दि. २७ जून रोजी ग्रामीण पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असताना मिळालेल्या माहितीवरून अवैध वाळू वाहतुक करणारे हायवा क्र MH 28 R 7800 पकडून वाळू वाहतूक करण्याचा परवाना नसल्याने सदर हायवा दोन पंचांसमक्ष जप्त करून गुन्हा दाखल केला. तसेच गोदावरी नदी पात्रातून अवैध वाळू उपसा करणारे बोट, इंजीन, तराफे जप्त करून एकूण २ गुन्हे दाखल केले. त्यामध्ये एकूण ५ आरोपी नामे समाधान बाबासाहेब जाधव रा. गोवर्धनघाट नांदेड, आदिनाथ मोरे, तुकाराम मोरे दोघे रा. भनगी अनोळखी दोन यांचे विरुद्ध पो.स्टे नांदेड ग्रामीण गु.र.न. ७८३/२०२६, ७८४/२०२६ कलम ३०३(२),३(५)



भा.न्या.सं, सह कलम ४८ (७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमप्रमाणे एकूण २ गुन्हे दाखल करून ७२ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोउपनि बाबुराव चव्हाण, पोउपनि व्यंकट कुसमे, पोहेकॉ. कानगुले, पोहेकॉ. भिसे, पोकॉ. जमीर, पोकॉ सिरमलवार यांनी केली.

जिल्ह्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतूक, अवैध दारू, जुगार, गुटखा आदी व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध कठार कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# दक्षिण व उत्तर विधानसभा स्तरावरील काँग्रेसचे प्रशिक्षण शिबीर संपन्न

## एसआयआर मोहिमेत गांभीर्याने सहभागी व्हावे -खा. रवींद्र चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी) –** निवडणूक आयोगाची विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहीम सुरू झाली आहे. आपल्या हक्काच्या मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जाऊ नयेत याची काळजी घेण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या बीएलए यांनी जागरूक राहून एसआयआर मोहिमेत गांभीर्याने सहभागी व्हावे, असे आवाहन खा. रवींद्र चव्हाण यांनी केले.



नांदेड उत्तर व दक्षिण विधानसभा मतदारसंघातील सर्व काँग्रेस बीएलए, ब्लॉक अध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी यांचे एसआयआर संदर्भात माहिती व प्रशिक्षण शिबीर रविवार दिनांक २८ रोजी काँग्रेस भवन येथे संपन्न झाले. यावेळी खा. रवींद्र चव्हाण बोलत होते.

यावेळी प्रशिक्षक विवेक जाधव, उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष तथा उत्तर विधानसभा बीएलए प्रमुख अब्दुल गफ्फार, नांदेड दक्षिण विधानसभा बीएलए प्रमुख श्रीनिवास मोरे उपस्थित होते. यावेळी प्रशिक्षक विवेक जाधव यांनी एसआरआय संदर्भात डीजीटल स्क्रीनवर माहिती व प्रशिक्षण दिले. दरम्यान यावेळी मधुकर दिघे, निरंजन पावडे, आनंदराव गुंडीले, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, फारूक भाई, सुरेश हाटकर, बापूसाहेब पाटील, संजय वाघमारे, नागराज सुलगेकर, दीपकसिंग हुजुरीया, रमेश चित्ते, शंकर शिंदे, आंबादास रातोळे, ज्योती कदम, नसिम पठाण, सुरेखा वैद्य, श्रीमती कदम, गगन यादव, किरण पडलवार, गणेश कोकाटे, प्रबुद्ध चित्ते, मुख्तार शेख, गौतम सिरसाट, अक्षय नळगे, विनोद कांचनगिरे, प्रसेनजित वाघमारे, अझर शेख, प्रकाश दिपके, कलिम शेख, नईम शेख, एसपी कुभारे आदींसह इतर काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'टीईटी' मुक्ती संदर्भात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे खासदार संपर्क अभियान

## माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांना शिष्टमंडळाने दिले निवेदन

**नांदेड (प्रतिनिधी)–**महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांची महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्रा) चे प्रांताध्यक्ष मधुकर उन्हाळे यांच्या नेतृत्वाखालील एका शिष्टमंडळाने भेट घेतली. या भेटीत सन २०१३ पूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटी परीक्षेतून मुक्त करण्यासाठी संसदेत विधेयक आणून कायदा पारित करण्यात यावा या मागणीचे निवेदन दिले.

एबीआरएसएम संलग्नीत महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषेदच्या वतीने दि. २५ जून ते दि ५ जुलै दरम्यान देशातील सर्व खासदारांना भेटून टीईटी परीक्षेतून सूट देण्यासंदर्भात मोहीम राबवण्यात येत आहे. यापूर्वी पहिल्या टप्प्यात देशातील सर्व जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय शिक्षण मंत्री यांना निवेदन देण्यात आले.

आरटीई ॲक्ट २००९ नुसार टीईटी बंधनकारक नसताना मा. सुप्रीम कोर्टाच्या



निर्देशानुसार देशातील सर्व शिक्षकांना टीईटी परीक्षा उतीर्ण होणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्रा.)च्या वतीने महाराष्ट्रातील सर्व पक्षीय खासदार महोदयांना निवेदन देऊन या संदर्भात येणाऱ्या पावसाळी अधिवेशनात संसदेत विधेयक मांडून २०१० पूर्वी नियुक्त शिक्षकांना टीईटी परीक्षेतून सूट देण्यात यावी व त्यांना सेवा संरक्षण देण्यात यावे या संदर्भात निवेदन देण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने नांदेड येथे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांना निवेदन देण्यात आले. यावेळी खा. चव्हाण यांनी येत्या पावसाळी अधिवेशनात हा महत्वपूर्ण विषय मांडणार असल्याचे सांगून सकारात्मक प्रतिसाद दिला.

या प्रसंगी शिष्टमंडळामध्ये महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद (प्रा.) चे प्रांत प्रवक्ते डी. एम. पांडागळे, मराठवाडा अध्यक्ष संजय कोठाळे, मराठवाडा कार्याध्यक्ष बालाजी पाटील बामणे, जिल्हाध्यक्ष व्यंकट गंदपवाड, प्रल्हाद राठोड, धोंडीबा पांडागळे, रवी ढगे, बळवंत मंगनाळे, अशोक पाटील सकनूरकर, शिवाजी कहाळेकर, जिल्हा प्रसिद्ध प्रमुख विठ्ठल मुखेडकर आदींची उपस्थिती होती.

# धानोरा (रुई) येथील जि. प. प्रशालेची दुरावस्था

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाचे साधन असून, शाळा या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र मानल्या जातात. मात्र हदगाव तालुक्यातील धानोरा (रुई) येथील जिल्हा परिषद प्रशालेची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या शाळेची जुनी इमारत सध्या पूर्णतः जीर्ण व मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहे. अशा अवस्थेत या परिसरात विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इमारतीच्या भिंतींना तडे गेले असून, छतही धोकादायक स्थितीत असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे. विशेषतः सध्या सुरू असलेल्या पावसाळी वातावरणात ही इमारत कधीही कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जर एखादी



दुर्घटना घडली तर विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या गंभीर प्रश्नाकडे जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन शाळेच्या नवीन इमारतीची उभारणी अथवा आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थ व पालकांकडून होत आहे. आता प्रशासन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न कितपत गांभीर्याने घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# हदगाव येथे अस्थिव्यंग लाभार्थ्यांना कृत्रिम अवयवांचे वाटप

**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र शासन दिव्यांग कल्याण विभाग, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, जिल्हा परिषद, एस. आर. ट्रस्ट मध्यप्रदेश व आलिम्को मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने हदगाव तालुक्यात अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हात पाय, कॅलिपर्स यांचे मोजमाप व तत्काळ साहित्य वाटत करण्यात आले.

या शिबिराचे आयोजन साईबाबा निवासी अपंग विद्यालय, सम्राट अशोक निवासी मतिमंद विद्यालय, निवासी मूकबधिर विद्यालय भदंत टेकडी समोर, तामसा रोड हदगाव येथे करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शिवराज बाबुराव कदम, सहायक आयुक्त अवधूत गंजेवार, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाचे गट विकास अधिकारी डी. के. आडेराव, डॉ. रुपेश जाधव, डॉ. आकाश यादव, शिवाजी पाळेकर, मुख्याध्यापक गजानन मोरे, मुख्याध्यापक विश्वंभर खाकरे, मुख्याध्यापक शेख आसिफ, निवासी मतिमंद विद्यालय हदगावचे ना. शी. बिजलीकर, समीर पटेल, डी. के. आडेराव, समीर पटेल व दिव्यांग संघटनेचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

या शिबिरात एकूण ११९ दिव्यांग व्यक्तींची तपासणी करून ७९ पात्र लाभार्थ्यांना कृत्रिम अवयवांचे वाटप करण्यात आले. सदरील शिबिराला दिव्यांग लाभार्थ्यांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला व शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी चारही विद्याल–यातील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कृत्रिम अवयवांचे वाटप करण्यात आलेल्या शिबिराला दिव्यांगांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# मासरेड अंतर्गत तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे, जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध मास रेडचे आयोजन करून एकूण ३ लाख ३० हजार १२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नांदेड जिल्ह्यातील अवैध व्यवसाय पूर्णतः बंद करण्यासंबंधाने अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे, जुगार खेळणाऱ्या इसमांविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी २७ जून रोजी मासरेडचे आयोजन केले होते.

या मासरेड दरम्यान अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणारे, जुगार खेळणाऱ्यांच्या ठिकाणावर छापा टाकून समूळ उच्चाटन करण्यासाठी राबविलेल्या मोहिमेमध्ये नांदेड जिल्ह्यात एकूण ८७ गुन्हे दाखल करून एकूण १०२ आरोपीतांवर



कारवाई करण्यात आली. या कारवाईत ३ लाख ३० हजार १२० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या मासरेड कामी अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सुरज गुरव यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड येथील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच सर्व पो. स्टे. चे प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी भाग घेतला होता.

# अबिनाश कुमार यांचा वडजे यांच्या निवासस्थानी सत्कार

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचा श्याम पाटील वडजे यांच्या सिडको येथील निवासस्थानी सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची पुणे येथे उपायुक्तपदी बदली झाल्यानंतर सिडको येथील श्याम पाटील वडजे यांच्या निवासस्थानी त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.



यावेळी श्याम पाटील वडजे यांच्या मातोश्री भागीरथीबाई वडजे, पत्नी सौ. सुचिता वडजे, डॉ. संतोष महाजन, सौ. उज्ज्वला महाजन, कु. सानिका महाजन, पत्रकार रमेश ठाकूर, तिरुपती घोगरे, शेख कलीम, गोविंद दुगावे, सुधीर देशमुख, डॉ. दत्ता मोरे, वामन सवराते, आनंद जाधव, अजिंक्य लोंढे, बालाजी चिखलीकर, अविनाश सवराते, मुकेश घोगरे, प्रशांत मनुरकर, महेश वडजे यांच्यासह सिडको परिसरातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# गोदावरीबाई दवे यांचे निधन

**अर्धापूर (प्रतिनिधी) –** तालुक्यातील दाभड येथील ज्येष्ठ महिला गोदावरीबाई आनंदराव दवे यांचे वृद्धापकाळाने रविवारी सकाळी निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर रविवार, दि. २८ जून रोजी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे वय ९० वर्षे होते.

त्यांच्या पश्चात दोन मुली, सुना, नाती, नातू-पणतू असा परिवार आहे. त्या गणेश दवे व श्रीकांत दवे यांच्या आजी होत.

# नांदेडच्या शिवसैनिकांचे उद्धव ठाकरे यांच्याकडून कौतुक

**नांदेड (प्रतिनिधी)–** दि. २२ जूनच्या रात्री नांदेडच्या विमानतळ परिसरातून अर्धापूरकडे निघालेल्या बंडखोर खासदारांचा ताफा रोखून प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली आणि हा ताफा रोखण्याचा प्रयत्न केला. या सर्व नांदेडच्या शिवसैनिकांचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी कौतुक केले आहे.

२२ जूनच्या रात्री बंडखोर खासदार नागेश पाटील आष्टीकर, संजय उर्फ बंडू जाधव आणि यवतमाळचे खासदार संजय देशमुख आदीजण नांदेड विमानतळावर आले. विमानतळावर नांदेडच्या शिवसैनिकांनी फलक व बॅनर झळकावून त्यांचा निषेध करीत घोषणाबाजी केली. या दरम्यान पोलीस बंदोबस्त असतानाही शिवसैनिकांनी खासदारांच्या विरुद्ध घोषणाबाजी केली. त्यानंतर हा ताफा अर्धापूरकडे जात असताना शिवसैनिकांनी पिंपळगाव पाटीजवळ या गाड्या अडवून परत त्याठिकाणी घोषणाबाजी करून जय भवानी जय शिवाजी, या गद्दाराच करायचं काय, खाली मुंडके वर पाय, पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांचा विजय असो, आदी घोषणाबाजी केली.

यावेळी पोलिसांचा मोठा ताफा असतानाही शिवसैनिकांनी खासदारांचा निषेध केला आणि



त्यांच्या गाड्या अडविल्या. या संदर्भात अर्धापूर पोलिसांत शिवसैनिकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पक्षप्रमुखांच्या आदेशानुसार या सर्व शिवसैनिकांना आज परभणी येथे बोलावण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख बबन बारसे, तालुका प्रमुख सुनिल पाटील कदम, तालुका संघटक नवनाथ जोगदंड आदी उपस्थित होते. बबनराव बारसे आणि सुनिल कदम यांनी घडलेला वृत्तांत सांगितला. प्रचंड बंदोबस्त असतानाही आम्ही शिवसैनिकांनी या गद्दारांचा निषेध करुन त्यांच्या गाड्या अडविण्याचा प्रयत्न केला, असे सांगताच पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी या सर्व शिवसैनिकांचे कौतुक केले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com